
रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १७ ◆ अंक ६०
www.ramprahar.com
सोमवार, १६ सप्टेंबर २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

तणावग्रस्त वातावरणानंतर मुरूडमध्ये शांतता सभा/२
राज्यात पुन्हा महायुतीचेच सरकार येणार -खा. तटकरे/५
गणेशोत्सवामुळे रायगडात कोट्यवधींची उलाढाल/७

## कोंझर घाटात बसला अपघात; सर्वजण सुखरूप



**महाड :** रायगड किल्ल्याहून नवी मुंबईत परतणाऱ्या पर्यटकांच्या खासगी बसला रविवारी (दि. १५) महाड तालुक्यातील कोंझर घाटात अपघात झाला. बस रस्त्याच्या बाजूला चिखलावरून घसरल्याने हा अपघात झाला. सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झाली नाही. या अपघाताची माहिती मिळताच कोंझर ग्रामस्थांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन गाडीमध्ये अडकलेल्या सर्व प्रवाशांना सुखरूप बाहेर काढले. ऐरोली येथील हे पर्यटक रायगड किल्ला पाहून परतत होते. एमएच ०४ जेके ८३८२ क्रमांकाच्या या बसमध्ये एकूण ४४ जण होते. बस चिखलात घसरून २५ ते ३० फुट कोसळली, परंतु चालकाने झाडाचा आधार घेत बस सुरक्षितपणे थांबवण्याचा प्रयत्न केल्याने मोठा अनर्थ टळला. स्थानिकांनी बसमधील सर्व प्रवाशांना सुखरूप गाडीतून बाहेर काढून धीर दिला.

# विरोधी पक्षाकडून मला पंतप्रधानपदाची ऑफर होती, मात्र मी ती धुडकावली!

## ■ केंद्रीय मंत्री नितीन गडकरींचा गौप्यस्फोट

**नागपूर : प्रतिनिधी**



लोकसभा निवडणुकीवेळी विरोधी पक्षातील एका बड्या नेत्याने माझ्याशी संपर्क साधून मला पंतप्रधानपदाची ऑफर दिली होती, असा गौप्यस्फोट भाजपचे ज्येष्ठ नेते तथा केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केला आहे. ते नागपूरमध्ये पत्रकारिता पुरस्कार सोहळ्यात बोलत होते. विरोधकांकडून देण्यात आलेली ऑफर आपण धुडकावली, असेही गडकरींनी या वेळी सांगितले.

केंद्रीय रस्ते वाहतूकमंत्री गडकरी म्हणाले की, मी कोणाचेही नाव घेणार नाही, पण लोकसभा निवडणुकीवेळी विरोधी पक्षातील एका नेत्याने मला पंतप्रधानपदाची ऑफर दिली होती, मात्र मी त्यांची ऑफर नाकारली. मी एक विचारधारा मानणारा व त्या विचारसरणीनुसार चालणारा, त्यासाठी कटिबद्ध असलेला माणूस आहे. मी एका अशा पक्षात आहे, ज्या पक्षाने मला सगळे काही दिले आहे, ज्याचा कधी स्वप्नातसुद्धा विचार केला नव्हता. कोणताही प्रस्ताव मला विचलित करू शकत नाही.

माझा विचारधारेवर विश्वास आहे. पंतप्रधान होणे माझे स्वप्न नाही. त्यामुळे पंतप्रधानपदाची ऑफर देणाऱ्या नेत्याला मीच प्रतिप्रश्न केले. तुम्ही मला पंतप्रधानपदासाठी पाठिंबा का देत आहात आणि मी तुमचा पाठिंबा का घेऊ, अशा शब्दांत पंतप्रधानपदाची ऑफर धुडकावल्याचे गडकरींनी सांगितले.

### 'अटल सेतूवरून उतरल्यावर १४ लेनचा रस्ता तयार करणार'

**पुणे :** अटल सेतूवरून खाली उतरल्यानंतर १४ लेन रस्ता तयार करण्यात येणार आहे. हा रस्ता बंगळुरू तसेच छत्रपती संभाजीनगरला जाणार असून पुणे रिंग रोडला जोडला जाणार आहे, अशी माहिती केंद्रीय रस्ते वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांनी दिली. ते पुण्यात बोलत होते.

विश्वेश्वरय्या यांनी महाराष्ट्रात २८ वर्ष काम केले. त्यानंतर ते गुजरातमध्ये गेले. त्यांनी अनेक मोठी कामे केली. विश्वेश्वरय्या यांना जयंतीनिमित्त आपण अभिवादन करत आहोत. मी बांधकाममंत्री होतो त्या वेळी अभियंता दिवस साजरा करण्याची सुरुवात झाली, असे सांगून केंद्रीय मंत्री गडकरी म्हणाले की, ग्रामीण भागातील अर्थव्यवस्था मजबूत झाली पाहिजे. तंत्रज्ञान हे समाजाचा विकास करणाऱ्या गरीब माणसाचे जीवनमान बदलणारे पाहिजे. गरीबांचे जीवनमान सुधारल्याशिवाय आत्मनिर्भर होणे शक्य नाही.



## संविधानामुळे आपले स्वातंत्र्य आणि अधिकार अबाधित –आमदार प्रशांत ठाकूर

### पनवेल आयटीआयमध्ये संविधान मंदिराचे उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

न्याय, समता आणि बंधूता हे भारतीय संविधानाचे स्तंभ आहेत. देशाच्या स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण झाली आहेत. संविधानामुळे आजही आपले स्वातंत्र्य आणि अधिकार अबाधित आहे. याचे महत्त्व आपण ओळखले पाहिजे, असे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी रविवारी (दि. १५) केले.



युवकांना कौशल्य विकास आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र शासन विविध योजना राबवित आहेत. त्यानुसार देशाचे उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांच्या हस्ते राज्यातील ४२४ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये (आयटीआय) संविधान मंदिराचे आभासी पद्धतीने उद्घाटन झाले. यानिमित्ताने पनवेल येथील आयटीआयमध्ये आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते संविधान मंदिराचे उद्घाटन करण्यात आले. त्या वेळी ते बोलत होते.

या कार्यक्रमाला भाजप अनुसूचित जाती मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अमित जाधव, माजी नगरसेवक तेजस कांडपिळे, विचुंबे ग्रामपंचायतीचे सरपंच प्रमोद भिंगारकर, अनंता गायकवाड, किशोर सुरते, संस्थेचे प्राचार्य नितीन चौधरी, उपप्राचार्य विजय टिकोले, प्रा. आकाश ठाकूर, संदीप वेले, गटनिदेशक नितिन देशमुख, अजय मयेकर, प्रभाकर नगरकर यांच्यासह इतर मान्यवर, पदाधिकारी उपस्थित होते.

या वेळी डॉ. पराग पाटील यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना संविधान आणि आपला अभिमान या विषयावर मार्गदर्शन केले. सर्वांच्या सहभागामुळे हा कार्यक्रम यशस्वी झाला.

## भीषण अपघातात पाच जण जागीच ठार

**धुळे :** छत्रपती संभाजीनगरील अपघाताची घटना ताजी असतानाच धुळे जिल्ह्यात भीषण अपघात घडला आहे. या अपघातात पाच जणांचा जागीच मृत्यू झाला असून चार जण गंभीर जखमी झाले आहेत.

धुळे जिल्ह्याच्या शिंदखेडा तालुक्यातील दसवेल फाट्याजवळ पीकअप वाहनाने ईको गाडीला समोरासमोर जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात ईको गाडीतील पाच जणांचा मृत्यू, तर चार जण गंभीर जखमी झाले आहेत. वारूळ गावातून कीर्तनाचा कार्यक्रम आटपून ही सर्व मंडळी आपल्या घराकडे परतत होती. मृतांमध्ये तीन महिलांचा समावेश आहे. जखमींना तातडीने धुळ्यातील हिरे रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. दरम्यान, पीकअपचालक मद्यधुंद अवस्थेत वाहन चालवत असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. त्याला या अपघातात किरकोळ दुखापत झाली आहे.

### मुंबईत पुन्हा हिट ॲण्ड रन

## भरधाव कारच्या धडकेत तरुणाचा मृत्यू

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईत आणखी एका हिट ॲण्ड रनची घटना समोर आली आहे. दहिसर येथे भरधाव कारने मोटरसायकलला धडक दिल्याने एकाचा मृत्यू झाला, तर एक जण जखमी झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार ही घटना १३ सप्टेंबर रोजी दुपारी ४च्या सुमारास घडली. फिर्यादी करण राजपूत (१८) हा त्याचा मित्र आदित्यसोबत दहिसरहून कांदिवलीच्या दिशेने दुचाकीने जात होता. त्याचा तिसरा मित्र पियुष शुक्ला हाही त्याच्यासोबत दुचाकी चालवत होता. हे तिघे शैलेंद्र हायस्कूल पुलाखालून येताच मागून भरधाव वेगाने येणाऱ्या कारने या दुचाकीला धडक दिली. त्यामुळे करण व आदित्य दोघेही गंभीर जखमी झाले. पाठीमागे बसलेल्या आदित्यला गंभीर दुखापत होऊन तो बेशुद्ध झाला, तर करणही गंभीर जखमी झाला. जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र आदित्यचा उपचारादरम्यान मृत्यू झाला.

या प्रकरणी दहिसर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी आरोपी कारचालकाचा शोध सुरू केला आहे.

## निवडक

### दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल राजीनामा देणार

**नवी दिल्ली :** मद्य धोरण गैरव्यवहार प्रकरणात दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना सर्वोच्च न्यायालयाने जामीन मंजूर केल्यानंतर ते तुरुंगातून बाहेर आले आहेत. त्यांनी रविवारी (दि. १५) आम आदमी पक्षाच्या कार्यकर्त्यांना संबोधित करताना पुढील दोन दिवसांत मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा देणार आहे, असे जाहीर केले. यावर भाजपने केजरीवाल स्वतःहून राजीनामा देत नाहीयेत, तर सर्वोच्च न्यायालयाने खडे बोल सुनावल्यानंतर त्यांच्याकडे दुसरा पर्यायच उरलेला नाही, असे म्हटले आहे.

### केरळमध्ये पुन्हा निपाहची धास्ती; तरुणाचा मृत्यू

**तिरुवनंतपुरम :** केरळमधील मलप्पुरम येथे एका २४ वर्षीय तरुणाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. केरळच्या आरोग्यमंत्री वीणा जॉर्ज यांनी एएनआय या वृत्तसंस्थेला सांगितले की, त्यांना निपाह व्हायरसची लागण झाली आहे. या तरुणावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू होते. मृत व्यक्ती बंगळुरू येथे राहात होती.

# आमदार महेश बालदी यांच्यामुळे उरण विधानसभा मतदारसंघाचा कायापालट

### भाजप नेते अरुणशेठ भगत यांचे प्रतिपादन ■ देवळोली येथे रस्ता कामाचे भूमिपूजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उरण विधानसभा मतदारसंघातील देवळोली गावात आमदार महेश बालदी यांच्या १३ लाख रुपयांच्या निधीतून अंतर्गत रस्त्याचे काम करण्यात येणार आहे. या कामाचे भूमिपूजन भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते रविवारी (दि. १५) झाले. या वेळी त्यांनी उरण मतदारसंघाचा आमदार महेश बालदी यांच्या पाच वर्षांच्या काळात कायापालट झाला असल्याचे प्रतिपादन केले.



आमदार महेश बालदी यांच्या प्रयत्न व पाठपुराव्यामुळे उरण मतदारसंघात अनेक विकासाची कामे मार्गी लागली आहेत, तर अनेक कामे नव्याने होत आहेत. या अनुषंगाने त्यांच्या १३ लाख रुपयांच्या स्थानिक आमदार निधीतून देवळोली येथील अंतर्गत रस्त्याचे काम करण्यात येणार आहे. या कामाचे भाजपचे पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते भूमिपूजन झाले.

या कार्यक्रमास भाजप तालुका सरचिटणीस भूपेंद्र पाटील, उपाध्यक्ष संदीप पाटील, गुळसुंदे विभागीय जि.प. अध्यक्ष डॉ. अविनाश गाताडे, मजदूर माथाडी सेलचे अध्यक्ष अनंतशेठ पाटील, सावळे सरपंच सुनील माळी, देवळोली सरपंच राजश्री पाटील, माजी सरपंच निलेशा पाटील, काजल पाटील, रामभाऊ पाटील, उमेश पाटील, मंगेश पाटील, भास्कर पाटील, अशोक पाटील, पी.पी. पाटील, विनोद पाटील, मनोज भंडारकर, हरिश्चंद्र पाटील, जयदास पाटील, राजेश पाटील, गजानन बडवी, भगवान कोंडीलकर, सुरेश गव्हाणकर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते. या कामाबद्दल सर्वांनी आभार मानले.

## जेएनपीएमध्ये ११.४० कोटींच्या विदेशी सिगारेट्स जप्त

**उरण : प्रतिनिधी**

मागील आठवड्यात रक्तचंदनाचा साठा जप्त केल्यानंतर न्हावाशेवा सीमा विभागाच्या एसआयआयबी अधिकाऱ्यांनी दुबईतून हैदराबाद येथे तस्करीच्या मार्गाने पाठविण्यात आलेल्या विदेशी सिगारेट्चा साठा जेएनपीएतून जप्त केला आहे. याची किंमत ११.४० कोटी रुपये आहे.

बंदी असतानाही तस्करी मार्गाने दुबईतून ४० फुटी कंटेनरमधून जिप्सी प्लास्टर बोर्डच्या बनावट नावाखाली ४०० कार्टूनमधून ५७ लाख विदेशी सिगारेट्सचा साठा पाठविण्यात आला होता. हा साठा हैदराबाद येथील एका कंटेनर यार्डात पाठविण्यात येणार होता, मात्र न्हावा शेवा सीमा शुल्क विभागाच्या एसआयआयबी अधिकाऱ्यांना या तस्करी मार्गाने पाठविण्यात येणाऱ्या विदेशी सिगारेट्सच्या मालाची बित्तंबातमी मिळाली होती. त्यानुसार अधिकाऱ्यांनी संशयित कंटेनरची कसून तपासणी केली असता मोठ्या खुबीने लपवून ठेवण्यात आलेला विदेशी सिगारेट्चा साठा आढळून आला. जप्त करण्यात आलेल्या विदेशी सिगारेट्च्या तस्करीप्रकरणी सीमा शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांकडून अधिक तपास केला जात आहे.

## महिला अत्याचारांवर जिवंत देखावा

### ■ कळंबोलीत राजे शिवाजीनगर रहिवासी मंडळाकडून समाजप्रबोधन

**कळंबोली : बातमीदार**

कळंबोलीतील राजे शिवाजीनगर रहिवासी मंडळाने सार्वजनिक गणेशोत्सवात महिला, मुलींवर अत्याचारासंदर्भातील जिवंत देखावा सादर केला आहे. या माध्यमातून समाजप्रबोधन करण्याचा हेतू असल्याचे मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.



या मंडळाचे हे ३७वे वर्ष आहे. यापूर्वी मंडळाने सार्वजनिक गणेशोत्सवातून जनजागृती म्हणून सामाजिक, ऐतिहासिक देखावे सादर केले आहेत. या वर्षी शालेय विद्यार्थी-विद्यार्थिनींनी रंगमंचावरून 'तिची काय चूक' या विषयावर आधारित जिवंत देखावा सादर केला आहे. पश्चिम बंगालमध्ये डॉक्टर तरुणीवर बलात्कार करून तिची केलेली हत्या, तसेच बदलापूरसह देशात अल्पवयीन मुली, महिलांवर झालेल्या अत्याचारांच्या घटनांवर भाष्य करण्यात आले आहे.

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांनी माता-भगिनींना सन्मानाची वागणूक द्या, असे आदेश दिले होते. पुण्यापासून नऊ कोसांवर असलेल्या रांझे गावचा पाटील बाबाजी उर्फ भिकाजी गुजर याने एका स्त्रीसोबत गैरवर्तन केल्याचे महाराजांच्या कानी आले. त्या वेळी त्यांनी बलात्कारी पाटलाचे हात पाय कलम करण्याचे आदेश दिले, हा विषय राजे शिवाजीनगर रहिवासी मंडळाने जिवंत देखाव्यासाठी निवडला आहे. महिला अत्याचारांविरोधात शासन, प्रशासन गंभीर असून अनेक निर्णय, उपाययोजना तसेच कायदे व शिक्षा कडक करण्यात आल्या आहेत. समाजानेही सजग राहून अशा घटनांना पायबंद घालण्यासाठी प्रयत्नशील राहणे आवश्यक बनले आहे.

लोकमान्य टिळक शताब्दी महोत्सवाच्या निमित्ताने राज्य सरकारच्या सांस्कृतिक विभागाकडून एप्रिल २०१६मध्ये तालुका पातळीवर पहिला, जिल्हा व विभागीय पातळीवर दुसरा अशा तिन्ही पातळ्यांवर रोख रक्कम, आकर्षक चषक, प्रशस्तीपत्र देऊन राजे शिवाजीनगर रहिवासी मंडळ सार्वजनिक गणेशोत्सवाला तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मंत्री सुधीर मुनगंटीवार आदी मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले होते.

यंदाच्या देखाव्याचे लेखन व दिग्दर्शन पंकज सूर्यवंशी यांनी केले आहे. आकर्षक विद्युत रोषणाई, उत्स्फूर्त अभिनय, ओजस्वी निवेदनामुळे गणेशभक्तांचा या देखाव्यास प्रतिसाद मिळत आहे.

## रायगडच्या मुलींचा क्रिकेट संघ पहिल्यांदाच सुपर लीगमध्ये दाखल

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन (एमसीए) आयोजित १५ वर्षांखालील मुलींची आंतरजिल्हा निमंत्रित निवडचाचणी क्रिकेट स्पर्धा पुणे येथे सुरू आहे. त्यामध्ये रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशन (आरडीसीए)च्या मुलींनी चमकदार कामगिरी करत साखळी फेरीत अव्वल स्थान प्राप्त केले व आजवरच्या इतिहासात पहिल्यांदाच सुपर लीगमध्ये दिमाखात प्रवेश मिळवला आहे.



एमसीएच्या स्पर्धेपूर्वी आरडीसीएच्या वतीने तीन प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते. त्याचा फायदा संघाला झाल्याचे दिसून येते. रायगडच्या संघाची कर्णधार रोशनी पारधी हिने लागोपाठ दोन शतके झळकावली असून तीन सामन्यात आपल्या धुवांधार फलंदाजीने एकूण ३०१ धावा काढून संघाला एकहाती विजय मिळवून दिला. रायगड संघाने सांगली व सीडीए क्लबविरुद्ध विजय मिळवला, तर हिंगोली संघाविरुद्ध पावसामुळे सामना अनिर्णीत राहिला व दोन्ही संघाला एक गुण देण्यात आला.

ग्रुप सीमध्ये रायगडच्या संघाने अव्वल स्थान प्राप्त केले आहे. लवकरच सुपर लीग फेरीतील सामने सुरू होतील. आरडीसीएच्या वतीने संघाला नवीन किट व तडाखेबंद फलंदाज रोशनी पारधी हिला इंग्लिश विल्लो बॅट बक्षीस आरडीसीए अध्यक्ष अनिरुद्ध पाटील यांनी जाहीर केले आहे. संपूर्ण संघाचे व प्रशिक्षकांचे जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या वतीने अभिनंदन करण्यात आले.

येणाऱ्या क्रिकेट हंगामात मुलींच्या क्रिकेटकडे आपण विशेष लक्ष देऊन त्यांच्या विविध वयोगटातील क्रिकेट स्पर्धा व प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करणार असल्याचे आरडीसीए अध्यक्ष पाटील यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

# एसटी प्रवासात अडचण आल्यास आगार प्रमुखांना करा फोन

**मुंबई : प्रतिनिधी**

एसटीच्या प्रवासात प्रवाशांना काही अडचण आल्यास त्यांना त्याबाबत थेट आगार प्रमुखांकडे तक्रार करता येणार आहे.

त्यानंतर तक्रारीचे तातडीने निराकरण होईल, अशा पद्धतीची यंत्रणा एसटी प्रशासनाकडून उभी करण्यात आली आहे. एसटी बसमध्ये चालकाच्या मागील बाजूस बस ज्या आगारातील आहे, त्या आगार प्रमुख, तसेच तेथील स्थानक प्रमुख व कार्यशाळा अधीक्षकांचा दूरध्वनी क्रमांक लिहिण्यात आला आहे.



एसटी प्रवासात चालक अतिवेगाने गाडी चालवत असेल, चालक गाडी चालवताना मोबाईलवर बोलत असेल, वाहक उद्धटपणे बोलला किंवा वाहकाने योग्य ठिकाणी उतरवले नाही अशा अनेक तक्रारी प्रवाशांच्या असतात, मात्र तक्रार नेमकी कुठे करावी, हा त्यांच्या समोरचा प्रश्न असतो. यापूर्वी एसटी बसमध्ये संबंधित आगाराचा व स्थानकाचा क्रमांक प्रसिद्ध केलेला असायचा, परंतु काही काळाने हे नंबर दिसेनासे झाले. त्यामुळे प्रवासात काही समस्या अथवा अडचण आल्यास त्यासाठी दाद कोणाकडे मागावी? हा एक मोठा प्रश्न प्रवाशांसमोर होता.

प्रवाशांच्या सूचनेनुसार एसटी महामंडळाने आता ज्या आगाराची बस आहे, त्या आगार प्रमुखांचा नंबर प्रसिद्ध करण्यास सुरुवात केली आहे जेणेकरून प्रवासादरम्यान प्रवाशांना अडचण अथवा समस्या निर्माण झाली तर त्या समस्येचे किंवा तक्रारीचे निराकरण तातडीने व्हावे, हा या मागचा उद्देश आहे.

त्यामुळे प्रवासादरम्यान त्यांना एखादी अडचण आल्यास थेट तिथे प्रदर्शित केलेल्या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधून अडचणीत अथवा समस्येचे निवारण तातडीने करावे, असे आवाहन एसटी महामंडळाने केले आहे.

## मुंबई-पुणे प्रवास होणार अधिक वेगवान

**मुंबई :** एमएसआरडीसीने हाती घेतलेल्या ठाणे खाडी पूल-३ प्रकल्पातील दक्षिणेकडील अर्थात मुंबईहून पुण्याच्या दिशेने जाणाऱ्या मार्गिकेचे काम पूर्ण झाले आहे. विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता जारी होण्यापूर्वी ही मार्गिका सेवेत दाखल होणार आहे.

सप्टेंबरअखेरीस वा ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात ही मार्गिका खुली होणार आहे. ही मार्गिका वाहतुकीस खुली झाल्यास मुंबईहून पुण्याकडे जाण्यासाठी खाडीपूल-२ सह नवीन ठाणे खाडी पूल-३ चा पर्याय उपलब्ध होणार आहे. त्यामुळे मुंबई-पुणे प्रवास वेगवान होणार आहे. मुंबई-पुणे प्रवासासाठी सध्या दोन खाडीपूल सेवेत आहेत. एमएसआरडीसीने ठाणे खाडी पूल-३ प्रकल्प हाती घेतला आहे. तांत्रिक अडचणींमुळे प्रकल्प लांबणीवर पडला होता. आता मात्र या प्रकल्पाने वेग घेतला आहे.

# तणावग्रस्त वातावरणानंतर मुरूडमध्ये शांतता सभा

## पोलिसांचे नागरिकांना सहकार्याचे आवाहन

**मुरूड : प्रतिनिधी**

शहरात शांतता राखण्यासाठी रविवारी (दि.१५) तहसील कार्यालयात शांतता सभेचे आयोजन उपविभागीय अधिकारी मुकेश चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले होते.

या वेळी तहसीलदार रोहन शिंदे, डीवायएसपी विनीत चौधरी, मुरूड पोलीस निरीक्षक उदय झावरे, एलआयबी प्रमुख मकरंद पाटील, सहाय्यक फौजदार निलेश गिरी आदींसह सर्वपक्षीय नेते व हिंदू-मुस्लिम समाजबांधवसुद्धा उपस्थित होता.



उपविभागीय अधिकारी मुकेश चव्हाण यांनी, मुरूड शहरात शांतता नांदण्यासाठी हिंदू-मुस्लिम नागरिकांनी प्रशासनास सहकार्य करावे. मनातील कलुषितपणा नष्ट करून येणारे सण आनंदात साजरे करावे. जमावबंदी आदेश लागू असून मोर्चा आला तर त्या मोर्चावर कायद्याप्रमाणे कारवाई करण्यात येईल, असा इशारा दिला. शहरात झालेल्या घटनेबाबत मुस्लिम समाजाने माफीसुद्धा मागितली असून शहर शांत ठेवणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य असल्याचे सांगितले.

डीवायएसपी विनीत चौधरी यांनी, एका अज्ञात मुस्लिम महिलेने व्हॉट्सअ‍ॅपवर मुस्लिम व्यक्तीच्या दुकानातून वस्तू खरेदी करण्याचा जो आग्रह धरला आहे. यामुळे दोन समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला. म्हणून या अज्ञात महिलेवर भारतीय न्यायसंहिता ३५३ (क) (२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यामुळे सोशल मिडियाचा अनावश्यक वापर करून लोकांच्या भावना भडकवणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्याचा इशारा दिला आहे.

मुस्लिम समाज अध्यक्ष राशीद फहीम, माजी उपनगराध्यक्ष अतिक खतीब यांनी घडलेली घटना निषेधार्थ असून यापुढे अशी घटना घडणार नाही याबाबत समाजतर्फे दक्षता घेण्यात येईल. आम्ही सर्व घडलेल्या घटनेबाबत दिलगिरी व्यक्त करीत आहोत. हिंदू समाजाने मनात कोणताही आकस न ठेवता एकोप्याने राहूया, अशी भूमिका मांडली.

मंगेश दांडेकर, श्रीकांत सुर्वे यांनी सोमवारी होणाऱ्या मोर्चात सहभागी न होण्यासाठी प्रत्येक समाज अध्यक्षांनी सलोखा कायम राखण्यासाठी आपल्या मुलांना या मोर्चात सहभागी होऊ नका, यासाठी समज देण्याबाबत सांगितले.

जिल्हा नियोजन मंडळाचे सदस्य मनोज भगत यांनी या लहान मुलांचे समुपदेशन करून पुन्हा असा प्रकार घडणार नाही याकडे विशेष लक्ष देण्याचे सांगितले.

# सहकारी संस्थांनी नव्या कायद्याची माहिती घ्यावी : मंत्री वळसे-पाटील

**पुणे : प्रतिनिधी**

विविध कार्यकारी सहकारी संस्थांनी आता फक्त कर्ज घेऊन वाटप करणे आणि वसूल करणे एवढेच काम करणे अपेक्षित नसून आता केंद्र सरकारच्या सहकार विभागाने आणलेल्या नवीन कायद्यानुसार या संस्थांना १५१ प्रकारचे विविध व्यवसाय करण्यास परवानगी दिली आहे. संस्थांच्या चेअरमन आणि सोसायट्यांनी या योजनांची माहिती घेऊन योजना राबवाव्यात, असे आवाहन सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांनी केले.



अवसरी, आंबेगाव येथील शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयाच्या कवयित्री शांता शेळके सभागृहात पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या वतीने आयोजित सहकार परिषद व बक्षीस वितरण समारंभात ते बोलत होते. या वेळी म्हाडाच्या पुणे गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळाचे अध्यक्ष शिवाजीराव आढळराव पाटील, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष प्रा. दिगंबर दुर्गाडे, उपाध्यक्ष सुनील चांदेरे, महाराष्ट्र सहकार विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक मंगेश तिटकारे, सहकारी संस्थाचे पुणे ग्रामीण जिल्हा उपनिबंधक प्रकाश जगताप, बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिरुद्ध देसाई, भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन बाळासाहेब भेंडे आदी उपस्थित होते.

उत्कृष्ट काम करणाऱ्या संस्थांना बक्षीस वितरण आणि सहकार क्षेत्रात घडत असलेले बदल आणि त्या अनुषंगाने संस्थांनी निश्चित करावयाची दिशा या अनुषंगाने या सहकार परिषदेचे आयोजन करण्यात आल्याचे सांगून मंत्री वळसे पाटील म्हणाले की, संस्था जपली तर आपल्याला त्यांची मदत होईल. शेतकऱ्याला पीक कर्ज, अन्य कोणतेही कर्ज वाटप, शैक्षणिक कर्ज आदींसाठी जिल्ह्यात चांगले काम आहे. सोसायट्यांनी शिस्तीने कारभार केला नाही तर तोटा वाढतो, कर्ज वाटप करून वसूली होत नसल्याने तोटा वाढतो व सोसायटी बंद पडली, तर त्याचा त्रास शेतकऱ्यांना होतो. बऱ्याच सोसायट्या अनिष्ट तफावतीमध्ये जातात. सोसायटीत अडचणीत आल्यास शेतकऱ्याला कर्जासाठी सावकाराकडे जावे लागते. ते किती तरी जास्त टक्केवारीने घेत असल्याने लोकांना त्रास होतो. त्यामुळे आपल्या संस्था जपल्या पाहिजेत आणि चांगल्या प्रकारे कारभार केला पाहिजे, असेही ते म्हणाले.

# अकरावी, बारावीलाही मराठी भाषेची सक्ती

**पुणे : प्रतिनिधी**

राज्यातील सर्व माध्यमांच्या शासकीय व खासगी व्यवस्थापनाच्या सर्व शाळांमध्ये मराठी भाषेचे अध्यापन व अध्ययन सक्तीचे करण्याच्या अधिनियमाची अंमलबजावणी प्रभावीपणे करणे आवश्यक असून अकरावी, बारावीसाठीही मराठीचे अध्यापन व अध्ययन सक्तीचे करण्यात आले आहे.



राज्यातील सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये मराठी भाषेचे अध्यापन व अध्ययन सक्तीचे करण्यात आले आहे. त्याची अंमलबजावणी १ एप्रिल २०२०पासून करण्यात येत आहे. अधिनियमाची २०२०-२१ पासून टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे.

कोरोना प्रादूर्भावामुळे लॉकडाऊनच्या कालावधीत शाळा नियमित सुरू नसल्याने राज्य मंडळाच्या शाळा वगळून इतर परीक्षा मंडळांच्या शाळांमध्ये २०२२-२३च्या आठवीच्या तुकडीला २०२३-२४ला नववीमध्ये, २०२४-२५ ला दहावीला एक वेळची बाब म्हणून मराठी विषयाची परीक्षा गुणांकनाची न ठेवता श्रेणी स्वरूपात मूल्यांकन करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

सवलत देण्यात आलेल्या इतर परीक्षा मंडळांच्या शाळांमधील शैक्षणिक वर्ष २०२२-२३मधील आठवीची तुकडी आता शैक्षणिक वर्ष २०२४-२५मध्ये दहावीत आहे. श्रेणी स्वरूपात मूल्यांकनाची सवलत ही या तुकडीपुरतीच मर्यादित होती. त्यामुळे ही सवलत २०२५-२६ या शैक्षणिक वर्षापासून संपुष्टात येत आहे.

इतर कोणत्याही तुकडीसाठी ही सवलत लागू असणार नाही. राज्यातील सर्व माध्यमांच्या शासकीय व खासगी व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये मराठी भाषेचे अध्यापन व अध्ययन सक्तीचे आहे, असे राज्य शासनाच्या शालेय शिक्षण विभागाने नमूद केले आहे.

## व्यसनमुक्ती जनजागृतीसाठी आमलेंची नियुक्ती

**नवी मुंबई : बातमीदार**

उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, नवी मुंबईतर्फे दिलीप आमले यांची व्यसनमुक्ती जनजागृती व वाहतूक नियम यासाठी नियुक्ती झाली आहे.

नवी मुंबई उपप्रादेशिक परिवहन अधिकारी सुरेंद्र निकम, सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी गजानन गावंडे, वरिष्ठ मोटार वाहन निरीक्षक सुनील मेहेत्रे यांनी आमले यांना नियुक्तीपत्र दिले. नेरूळच्या वाहन तपासणी मैदानावर ट्रकचालकांसाठी सोमवारी, रिक्षाचालकांसाठी गुरुवारी आमलेंचे व्याख्यान होणार असल्याचे नवी मुंबई उपप्रादेशिक परिवहन अधिकारी सुरेंद्र निकम यांनी सांगितले.



# 'मोदक स्पर्धेतून पाक कौशल्याला वाव'

**पनवेल : वार्ताहर**

ओरायन मॉलने रायगडमधील महिलांसाठी आयोजित केलेली मोदक स्पर्धा ही गृहिणींच्या पाक कौशल्याला वाव देणारी असून वेगवेगळ्या प्रकारचे मोदक आज बघून आनंद झाला असल्याचे प्रतिपादन सुप्रसिद्ध अभिनेत्री व स्टार प्रवाहावरील 'आनंदी' भूमिका साकारणाऱ्या दिव्या पुगावकर यांनी केले. मोदक स्पर्धेच्या यशस्वी गृहिणींना बक्षिस देताना त्या बोलत होत्या.



या वेळी ओरायन मॉलचे मालक मंगेश परुळेकर, डायरेक्टर मनन परुळेकर, दिलीप करोलिया, प्रियांका मॅडम यांच्यासह मोठ्या संख्येने गृहिणी या स्पर्धेत सहभागी झाल्या होत्या. एकूण ५० स्पर्धकांनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता व त्यांनी वेगवेगळ्या प्रकारचे आकर्षक असे मोदक बनविल्याने परीक्षकांनासुद्धा नंबर काढणे मोठे कठीण काम होते.

या वेळी प्रथम क्रमांक शिवानी घरत यांनी पटकाविला त्यांना आयपॅड बक्षिस देण्यात आले, तर द्वितीय क्रमांक भाग्यश्री पाटील यांना मिळाला त्यांना ट्रॅव्हल बॅग देण्यात आली. तृतीय क्रमांक कविता दळवी त्यांना मिक्सर देण्यात आला.

उत्तेजनार्थ बक्षिस रितीका गायकवाड यांना मिळाला त्यांना फेस किट देण्यात आले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सुप्रसिद्ध निवेदक सागर चव्हाण यांनी केले.

# धो धो पडणाऱ्या पावसाच्या पाण्याचे करा संवर्धन

## महाडच्या काकरतळे तरुण उत्साही मंडळाच्या देखाव्यातून संदेश

**महाड : प्रतिनिधी**

महाडमधील काकरतळे येथील तरुण उत्साही मंडळ व महिला मंडळाच्या माध्यमातून पडणाऱ्या पावसाच्या पाण्याचे कशाप्रकारे संवर्धन करता येईल, याचा देखावा सर्वांसाठी प्रेरणा देणारा ठरत आहे.

महाड शहरातील काकरतळे येथील मंडळाच्या माध्यमातून सलग १५ वर्षे सार्वजनिक गणेशोत्सव साजरा केला जात आहे. मंडळाच्या माध्यमातून आतापर्यंत चंद्रयान, सेंद्रिय शेती, गो पालन, आदी विषयावर देखावे सादर केले आहेत. यावर्षी इलेक्ट्रॉनिक वस्तूंच्या आवरणाचे पुठ्ठे, लाकडी फळ्या आदी टाकाऊ वस्तू गोळा करून देखावा सादर करण्यात आला आहे. याकरीता मंडळातील लहान बच्चेकंपनी आणि तरुणांनी मेहनत घेतली.



कोकणामध्ये मोठ्या प्रमाणावर पाऊस कोसळतो. तरीदेखील पाणीटंचाईला सामोरे जावे लागते. याकरीता इमारत, बंगले आणि घरांवरून खाली येणारे पाणी योग्य नियोजन केल्यास वर्षभर पुरेल इतके पाणी साठा करून ठेवता येते. रेनवॉटर हार्वेस्टिंग आणि इतर पद्धतीने जलसंवर्धन केल्यास इमारतींना इतर कामासाठी लागणारे पाणीदेखील यातून वापरता येणे शक्य आहे. हे पाणी कसे वाचवायचे याची प्रात्यक्षिक देखाव्याच्या माध्यमातून काकर तळे तरुण उत्साही मंडळ व महिला मंडळाच्या गणेशोत्सव सोहळ्यातून प्रेरणा देत आहे.

शिवकाळापासून जलसंवर्धन कशा पद्धतीने केले गेले होते त्याच धर्तीवर शहरातील इमारतींवरून खाली कोसळणारे पाणी जर का व्यवस्थित संवर्धन केले तर पाणीटंचाईला सामोरे जाणे टाळता येईल, असे सांगितले. प्रवीण जोशी यांनी हा देखावा सादर करीत असताना भविष्यातील पाणीटंचाई हा विषय डोळ्यासमोर ठेवून भविष्यात शहर विकसित होत असताना रेनवॉटर हार्वेस्टिंगसारखे उपक्रम इमारत, बंगले या ठिकाणी राबवले गेले पाहिजे. यातून पाणी बचत होईल आणि पाणीटंचाईही भासणार नाही, असे सांगितले.

# खांदाडमधील तरुणांनी पकडले मगरीचे पिल्लू

**माणगाव : प्रतिनिधी**

नगरपंचायत हद्दीतील खांदाड येथे शनिवारी (दि.१४)रात्री पाच फुटी मगरीचे पिल्लू आढळले. या मपिल्लाला तरुणांनी दोन तासांच्या प्रयत्नांनंतर पकडून काळ नदीच्या पात्रात सोडून देण्यात आले.



खांदाड गावातील बाबळ या ठिकाणी पाण्याचा डोह आहे. गतवर्षी खांदाड गावात काळ नदीच्या पुराचे पाणी भरले होते. नदीच्या पात्रातील एक मोठी मगर तुंबलेल्या पाण्यात अडकून पडली होती. यावर्षी त्या मगरीला ७-८ पिल्ले झाली आहेत. या मगरी अन्नाच्या शोधात जवळच असलेल्या घराजवळ येत असतात. अशीच एक मगर घराजवळ येताना डी. जे. बाळा या तरुणाला दिसली. या ठिकाणी सर्व तरुणांनी एकत्र येत या मगरीच्या पिल्लाला दोन तासांच्या मेहनतीनंतर जीवाची पर्वा न करता पकडण्यात यश मिळविले.

# सीबीडीच्या राजाची गणेशभक्तांना भुरळ

**नवी मुंबई : बातमीदार**

सांस्कृतिक सोहळ्याच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जोपासण्याचे कार्य सीबीडीचे साई एकता मित्र मंडळामार्फत स्थापना होणारी आकर्षक मूर्ती व नेत्रदीपक देखावा हे शहरवासीयांचे आकर्षण ठरत आहे. यंदादेखील महालाच्या देखव्याने भक्तांना भुरळ पाडली आहे.

मंडळामार्फत यंदा महालाचा देखावा उभारून त्यात १३ फुटी श्रीगणेशाच्या मूर्तीची स्थापना करण्यात आली आहे. गणेशोत्सव काळात मंडळाने समजोपयोगी कार्यक्रम राबवत आपले सामाजिक उत्तरदायित्व कायम ठेवले आहे. मंडळामार्फत अनेक सामाजिक, लोकोपयोगी उपक्रम राबवून नागरिकांच्या मनात आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे.

सर्वधर्मसमभाव ही या मंडळाची महत्त्वाची बाब मानली जाते. गरजू विद्यार्थ्यांसाठी सदैव मदतीचा हात दिला जातो. गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांना प्रोत्साहन देखील दिले जाते.

कोरोना काळात सीबीडी परिसरात परिसरात मदतीचा पुरेपूर प्रयत्न मंडळामार्फत झाला होता. आरोग्य शिबिरांचे आयोजन केले जाते. दहीहंडी उत्सवात आंधळी दहीहंडी उभारली जाते. १ मे म्हणजेच महाराष्ट्र दिनाच्या औचित्यावर प्रतिवर्षी भंडाऱ्याच्या माध्यमातून अडीच ते तीन हजार नागरिकांना अन्नदान केले जाते. त्यामुळे साई एकता मित्र मंडळ वर्षभर कार्यरत असते.



## निवडक

### लोकलच्या धडकेने व्यक्तीचा मृत्यू

**पनवेल :** अज्ञात लोकलच्या धडकेने एका व्यक्तीचा मृत्यू झाला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध रेल्वे पोलीस करीत आहेत. हा व्यक्ती हा मुस्लीम समाजाचा असून वय अंदाजे ३० वर्षे, उंची पाच फुट पाच इंच, अंगाने मध्यम, रंग सावळा, डोक्याचे केस काळे व वाढलेले, दाढी साधारण काळी, नाक सरळ, चेहरा गोल आहे. मानेच्या उजव्या बाजूस उर्दु भाषेत गोंदलेले आहे. अंगात काळा सफेद फुलाची डिझाईन असलेला शर्ट व निळी जिन्स आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी रेल्वे पोलीस ठाणे (०२२-२७४६७१२२) किंवा परि.पोलीस उपनिरीक्षक पी.बी.जगताप यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### लोकलमधून पडून एकाचा मृत्यू

**पनवेल :** खारघर रेल्वे स्टेशन ते बेलापूर रेल्वे स्टेशन दरम्यान एका अप अज्ञात लोकल गाडीतून खाली पडून एका व्यक्तीचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. मयत व्यक्तीचे अंदाजे वय ४० वर्षे, उंची पाच फुट पाच इंच, अंगाने मध्यम, रंग काळा सावळा, डोक्याचे केस वाढलेले, दाढी वाढलेली, डोळे काळे बारिक, नाक सरळ, चेहरा उभट असून, उजव्या हाताच्या मनगटावर इंग्रजीमध्ये एस असे गोंदलेले आहे. अंगात गुलाबी निळ्या उभ्या रेषा असलेला टी शर्ट व काळी पॅन्ट आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी रेल्वे पोलीस ठाणे (०२२-२७४६७१२२) किंवा परि.पोलीस उपनिरीक्षक शिवाजी भोसले यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# गर्भवतींना मिळणार मोफत रुग्णवाहिका

## पनवेल मनपातर्फे लवकरच टोल फ्री नंबर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नुकत्याच घडलेल्या गरोदर मातेस संदर्भ सेवेवेळी १०८ रुग्णवाहिका न मिळाल्याच्या घटनेची पुनरावृत्ती होऊ नये व जनसामान्यास महापालिका देत असलेल्या सोयीसुविधांची माहीती मिळणेसाठी आयुक्त मंगेश चितळे यांच्या आदेशानुसार महापालिका क्षेत्रातील गरोदर मातेस उपलब्ध मोफत रुग्णवाहिका सेवेचे टोल फ्री नंबर लवकरात लवकर कार्यान्वित होणार आहेत.

आजपर्यंत महापालिकेच्या वतीने गरोदर मातेसाठी निशुल्क उपलब्ध असलेल्या रुग्णवाहिकेने २८९ प्रसुती रुग्णांसाठी अगदी मुंबई पर्यंत संदर्भ सेवा दिली आहे. नुकत्याच घडलेल्या घटनेतील प्रसुती रूग्ण परदेसी गौंड यांना न मिळालेल्या संदर्भसेवेबाबत चौकशी समिती गठीत करण्यात आली होती. या समितीच्या प्राथमिक अहवालानुसार प्रसुती पूर्व आशा सेविका व आरोग्य सेविकांमार्फत वारंवार भेट देऊन माता बाल संगोपन कार्ड वरती रुग्णवाहिकेचे १०८ व १०२ नंबर तसेच आशा सेविकेचा मोबाईल क्रमांक देण्यात आला होता.





गरोदर मातेच्या सर्व चाचण्या, सोनोग्राफी महापालिकेमार्फत निशुल्क करून देण्यात आल्या होत्या, परंतु सदर गरोदर मातेस दिलेल्या तारखे आधीच प्रसुती वेदना सुरू झाल्या व त्यांना खाजगी डॉक्टरांनी १०८ क्रमांवर संपर्क साधून उपजिल्हा रुग्णालय येथे जाण्याचे सुचवले. त्यानुसार नातेवाईकांनी १०८ टोल फ्री क्रमांकावरील रुग्णवाहिकेस कळविले, मात्र पुन्हा १०८ क्रमांकाच्या रुग्णवाहिकेचा व रुग्ण नातेवाईक यांचेमध्ये फोनद्वारे योग्य तो संपर्क झाला नाही. तसेच नातेवाईकाने १०२, उपजिल्हा रुग्णालय, महानगरपालिकेच्या रुग्णावाहिकेसाठी कोणताही संपर्क साधला नाही. तोपर्यंत उशीर होत असल्याने नातेवाईकांनी उपलब्ध वाहनातून रुग्णास उपजिल्हा रुग्णालय, पनवेल येथे प्रसुतीसाठी दाखल केले. उपजिल्हा रुग्णालयात रुग्णांची नैसर्गिक प्रसुती होऊन बाळास जन्म दिला. १२ सप्टेंबर रोजी रुग्णालयातुन डिस्चार्ज देऊन घरी मातेस घरी सोडण्यात आले.

रुग्णवाहिकेच्या १०८ क्रमांक आस्थापनेस याबाबतचा संपूर्ण खुलासा सादर करण्याबाबत चौकशी समितीने सुचित केले आहे. भविष्यात अशा संदर्भ सेवेपासून रुग्णांनी वंचित राहू नये यासाठी पालिकेच्या रूग्णवाहिकेसाठी टोल फ्री नंबर लवकरच सुरू करण्यात येणार आहे. टोल फ्री नंबर आल्यानंतर यास व्यापक प्रसिद्धी देण्याच्या सूचना आयुक्तांनी दिल्या आहेत.

रुग्ण सेवेसाठी पनवेल महानगरपालिका नेहमीच कटिबद्ध असून इतर रुग्णांसाठीच्या संदर्भ सेवेसाठी देखील लवकरात लवकर ठराव घेऊन रुग्णवाहिका उपलब्ध करण्याबाबत आयुक्तांनी संबधित विभागास सूचित केले आहे.

### निशुल्क सेवेचा लाभ घ्या!

*१. डॉ. रेहाना मुजावर, माता बाल संगोपन अधिकारी, मोबाईल क्रमांक ९३७२८८७१२३०*

*२. वाहनचालकचे नाव : नरेंद्र सोनवणे मोबाईल क्रमांक ७०२१५७२९१६, वेळ सकाळी ७ ते रात्री ७*

*३. वाहनचालकाचे नाव : धर्मा गवळी मोबाईल क्रमांक ९५९४७४६५२७, वेळ रात्री ७ ते सकाळी ७*











## गणेश दर्शन

**पनवेल : भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी तालुक्यातील आपटे येथे भाजपचे संजय टेंबे व माजी पं.स. सदस्य तनुजा टेंबे, सुकापूर येथे गाव अध्यक्ष राजेश पाटील, योगेश पाटील यांच्या घरातील विराजमान बाप्पाचे दर्शन घेतले. या वेळी भाजप अनुसूचित जाती मोर्चा जिल्हाध्यक्ष अमित जाधव, माजी पं.स. सदस्य भूपेंद्र पाटील उपस्थित होते. यासोबतच नवीन पनवेल येथील जागृती पीपल्स असोसिएशन व अष्टविनायक मित्र मंडळ यांच्या गणरायाचे दर्शन घेतले. या वेळी मंडळाचे अध्यक्ष अमित जाधव व सदस्यांनी त्यांचे स्वागत केले.**

# पनवेल महापालिकेच्या प्रारूप विकास आराखड्यासंदर्भात कामोठेकरांचे निवेदन

## संघर्ष समितीचे अध्यक्ष राजेश गायकर यांनी वेधले लक्ष

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेने जाहीर केलेल्या प्रारूप विकास आराखड्यावर कामोठे संघर्ष समिती अध्यक्ष राजेश गायकर यांनी कामोठे परिसरातील समस्यांसंदर्भात सूचना व हरकती निवेदनाद्वारे केल्या आहेत.

यामध्ये कामोठे, जुई, नौपाडा या गावालगत पूर्वीपासून खेळासाठी जमिनी उपलब्ध होत्या. या विभागाचे झपाट्याने शहरीकरण झाले मात्र पालिकेच्या प्रारूप आराखड्यात मूळ गावाभोवती खेळाच्या मैदानांचे आरक्षण ठेवलेले नाही. ही पहिली हरकत नोंदवून कामोठे, जुई आणि नौपाडा ही शासनाने सिडकोतर्फे जमिनी संपादित केल्याने १०० टक्के भूमिहीन गावे आहेत. गावाभोवतीच्या मोकळ्या जागेत अनेक पिढ्या मैदानी खेळ खेळले, लग्न, साखरपुड्या सारखे कार्यक्रम होत होते. शासनाच्या कृपेने भूमिहीन झालेल्या या गावांना पालिकेच्या या प्रारूप आराखड्यात खेळासाठी, लग्न आदि कार्यक्रमांसाठी आणि सांस्कृतिक कार्यासाठी गावालागत मैदान आरक्षण करावे. कामोठे गावकऱ्यांनी NDZमधील सेक्टर ४मध्ये लोकवर्गणीतून सुमारे ३० लाख रुपये खर्च करून बनवलेले क्रिडांगणावर हे आरक्षण कायम करण्याची सूचना गायकर यांनी केली आहे.

दुसरी हरकत कामोठ्यातील जवळजवळ प्रत्येक बिल्डिंगला दुकानं आहेत. या दुकानांसमोर ग्राहकाने गाडी पार्क केल्यास ट्रॅफिक पोलीस या गाड्या कामोठे येथून कळंबोली येथे उचलून नेतात. त्यामुळे कामोठे करांना आपली गाडी सोडवण्यासाठी कळंबोलीतील ट्रॅफिक कार्यालय गाठावे लागते. कामोठे शहरात ट्राफिक पोलिसांना कारवाई केलेल्या गाड्या ठेवण्यासाठी भूखंड आरक्षित केलेला नाही. अशी नोंदवून कामोठे शहरात पार्किंगची प्लॉटची कमी आहे. संपूर्ण कामोठे शहर साडेबारा टक्के भूखंड योजनेतून बनलेला असल्याने खारघर कळंबोली च्या तुलनेत कामोठे शहरातील रस्ते अरुंद आहेत. अशातच नागरिकांनी दोन मिनिटाच्या खरेदीसाठी दुकानासमोर गाडी पार्क केली असता ट्राफिक पोलीस अशा गाड्या उचलून नेतात. आपली गाडी सोडवण्यासाठी येथील नागरिकाला कामोठ्यातून कळंबोलीचे ट्राफिक कार्यालय गाठावे लागते. यामुळे ट्रॅफिक पोलिसांकरिता महानगरपालिकेच्या प्रारूप आराखड्यामध्ये कामोठ्यामध्ये कारवाई केलेल्या गाड्या ठेवण्यासाठी कामोठ्यामध्येच भूखंड उपलब्ध करून द्यावा, अशी सूचना केली आहे.

तिसरी हरकत कामोठे जुई, नौपाडा ही सिडको वतीने १०० टक्के भूमिहीन केलेली गावे आहेत. शहरीकरणाने गावाची वाढलेली लोकसंख्या यामुळे वाढलेल्या दुचाकी, रिक्षा, कार, जिप टेम्पो आशा गाड्या गावच्या पूर्वीपासूनच्या अरुंद गल्ली बोळा मुळे गावातील मुख्य रस्त्यावरच उभ्या असतात. याकरिता कामोठे, जुई, नौपाडा या गावांलगत वाहनतळासाठी भूखंड आरक्षित केलेले नाही, असे नोंदवून भविष्यात गावात आग लागल्यास, पेशंटला ने आण करण्यास ॲम्ब्युलन्सला मुख्य रस्त्यात गाड्या पार्क असल्यामुळे अडचणी उद्भवत आहेत. याकरीता कामोठे, नौपाडा, जुई या गावांलगत गाड्या पार्क करण्यास पालिकेच्या या प्रारूप आराखड्यात वाहनतळासाठी आरक्षण करावे. ज्यामुळे गावातील मुख्य रस्ते वाहतुकीस खुले होतील, अशी सूचना गायकर यांनी केली आहे. या हरकती व सूचनांची तीन निवेदने त्यांनी पनवेल महापालिका आयुक्तांकडे दिली आहेत.

# नवीन पनवेलमध्ये राष्ट्रीय हिंदी दिवस उत्साहात

## * आमदार प्रशांत ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सहयोग स्नेह सेवा संस्थानच्या वतीने नवीन पनवेलमधील कर्नाटका हॉलमध्ये शनिवारी (दि.१४) राष्ट्रीय हिंदी दिवस मोठ्या उत्साहात आणि आनंदात झाला. या कार्यक्रमाला आमदार प्रशांत ठाकूर यांची उपस्थिती लाभली.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी राष्ट्रीय हिंदी दिवसाच्या सर्वांना शुभेच्छा देऊन भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कारकिर्दीत देश सकारात्मक दिशेने पुढे जात असल्याचे सांगितले. कालच पोर्ट ब्लेअरचे नाव बदलून विजय द्वीप केल्याचे सांगितले.संतोष दीदी आणि सहयोग स्नेह सेवा संस्थानचे सर्वच कार्यकर्ते पनवेलमध्ये जे काही अनेक समाजोपयोगी आणि देशहिताचे कार्यक्रम करीत असल्याबद्दल त्यांनी कौतुक केले तसेच या चांगल्या कार्यक्रमासाठी बोलावले म्हणून आयोजकांना धन्यवाद दिले.

या कार्यक्रमास भाजप नेत्या बिंदू दुबे, प्रदुमन शुक्ला, संतोष शर्मा, अंबिका तिवारी, सहयोग स्नेह सेवा संस्थानचे अध्यक्ष कैलास मिश्रा, संस्थापिका संतोष दीदी, प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय पनवेल सेवा केंद्र प्रमुख तारादीदी, पत्रकार मिलिंद खारपाटील, कुलभिर सिंग चंडोक, पुष्पा तिवारी, अर्चना मुजुमदार, भारती मिश्रा, चंदा सिंह आदी उपस्थित होते.

या वेळी देशभक्तीपर गीते आणि नृत्य यांचे आयोजन करण्यात आले होते. याचा उपस्थितांनी आनंद लुटला. उपस्थित मान्यवरांना जय श्री रामचा दुपट्टा आणि तुळसीचे रोपटे देऊन पर्यावरणा प्रती जागरूक करण्यात आले तसेच बी बी बांठीया ज्वेलर्स कडून उपस्थित मान्यवरांना चांदीची गणेशमूर्ती देऊन सन्मानित करण्यात आले.

डॉ. शिखा पांडे यांनी उपस्थित सर्वांना कोलगेट टूथपेस्टचे मोफत वाटप केले. दुपारी दोन ते सायंकाळी सहा या दरम्यान चाललेल्या या राष्ट्रीय हिंदी दिवस कार्यक्रमास एक हजाराहून अधिक जणांनी उपस्थिती लावली.

# अभिनव युवक मित्र मंडळाच्या श्री गणेशोत्सव अंकाचे प्रकाशन



**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहरातील पायोनिअर विभागातील ३४ वर्ष सामाजिक तसेच शैक्षणिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या अभिनव युवक मित्र मंडळाच्या श्री गणेशोत्सव २०२४-२५ या अंकाचे प्रकाशन श्री गणरायाच्या आशीर्वादाने करण्यात आले.

या वेळी मंडळाचे कार्याध्यक्ष नितीन पाटील व सदस्य संजय कदम यांच्या हस्ते या अंकाचे प्रकाशन करण्यात आले. या वेळी मंडळाचे अध्यक्ष राजा चव्हाण, उपाध्यक्ष अल्पेश पाडावे, खजिनदार शैलेश कदम, चिटणीस सचिन नाझरे, प्रसिद्ध गायक मुकेश उपाध्ये, मयुर चिटणीस, राहुल सावंत, परेश बोरकर, प्रवीण सावंत, रुपेश नागवेकर, सुनील म्हात्रे, प्रकाश लाड, महेश सरदेसाई यांच्यासह मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. या वेळी मंडळाचे सदस्य संजय कदम यांचा वाढदिवससुद्धा साजरा करण्यात आला.





**नवी मुंबई : आमदार गणेश नाईक व आमदार रमेश पाटील यांना वाढदिवसानिमित्त खासदार नरेश मस्के, कामगार नेते सुरेश पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी राजेंद्र घरत, मनमोहन महाराज, डी.पी. सोनावणे आदी उपस्थित होते.**

## संपादकीय

# मराठी सक्ती आवश्यकच

**महाराष्ट्रातील सर्व खासगी आणि सरकारी माध्यमांच्या शाळांमध्ये मराठी भाषा अध्ययन आणि अध्यापन सक्तीचे करण्याबाबत शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. पुढील म्हणजेच २०२५-२६ या शैक्षणिक वर्षापासून सर्व माध्यमातील शाळांमध्ये मराठी विषयाची परीक्षा घेतली जाईल.**

संत ज्ञानेश्वर माऊलींनी मराठीचे भाषेचे वर्णन 'माझा मराठीची बोलू कौतुके परि अमृतातेहि पैजासी जिंके, ऐसी अक्षरे रसिके मेळवीन' अशा शब्दांत केलेले आहे, तर कवी सुरेश भट यांनी 'लाभले आम्हांस भाग्य बोलतो मराठी, जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी या काव्यपंक्तीतून मराठीचा गोडवा गायला आहे. अनेक संत मंडळींनी आपल्या बोलीतून मराठी भाषेचे महत्त्व अधोरेखित केले. थोर लेखक, कवींनीही आपल्या शब्दसामर्थ्यामधून मराठी भाषा समृद्ध केली, पण तरीही आज हीच आपली मातृभाषा कुठेतरी मागे पडते असल्याचे चित्र आहे. म्हणूनच मराठी भाषा सक्तीच्या दिशेने महाराष्ट्र सरकारने मोठे पाऊल उचलले असून शालेय अभ्यासक्रमात मराठी विषय खासगी तसेच सरकारी शाळेत सक्तीचा करण्याचा महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. याबाबतचा शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. खरंतर राज्यातील सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये मराठी भाषेचे अध्यापन व अध्ययन यापूर्वीच सक्तीचे करण्यात आले असून त्याची अंमलबजावणी सन २०२०-२१पासून टप्प्याटप्प्याने सुरू करण्यात आली आहे. तथापि, कोविड-१९ संसर्गाच्या पार्श्वभूमीवर टाळेबंदीच्या कालावधीत शाळा नियमित सुरू नव्हत्या. आता नव्या २०२५-२६ या शैक्षणिक वर्षापासून सर्व माध्यमातील शाळांमध्ये मराठी विषयाची परीक्षा घ्यावीच लागणार आहे. या परीक्षेत मराठी विषयाला श्रेणी देऊन मूल्यांकन न करता गुण देऊन मूल्यांकन केले जाणार आहे. राज्य मंडळाच्या शाळा वगळून इतर परीक्षा मंडळाच्या शाळांमध्ये सन २०२२-२३च्या आठवीची बॅच २०२३-२४ला नववीमध्ये व २०२४-२५ला दहावीला जाईल त्यांना एकवेळची बाब म्हणून मराठी विषयाची परीक्षा गुणांकनाची न ठेवता श्रेणी स्वरूपात मूल्यांकन करण्याबाबतचा निर्णय शासन निर्णयाद्वारे घेण्यात आलेला आहे. दरम्यान, इतर माध्यमातील शाळांमध्ये मराठी भाषा विषय गांभीर्याने शिकवला जात नसल्याचे निदर्शनास आल्यानंतर राज्य सरकारकडून ही नवी नियमावली जाहीर करण्यात आली आहे. २०२५-२०२६ या शैक्षणिक वर्षापासून होणार या नव्या पद्धतीची अंमलबजावणी होणार आहे. आतापर्यंत इंग्रजी माध्यमांतील शाळांमध्ये मराठी भाषा विषयाची परीक्षा घेऊन श्रेणी दिली जायची, मात्र त्यामुळे मराठीचे अध्ययन आणि अध्यापन गांभीर्याने होत नसल्याचे निदर्शनास आले होते. त्यामुळे सरकारने नव्याने जीआर काढून मराठी सक्तीची केली आहे. राज्य सरकारचा हा निर्णय स्वागतार्ह आहे, कारण आज आपण पाहतो मराठी भाषा इतकी समृद्ध आणि संपन्न आहे, पण तिला राज्यातच सापत्नपणाची वागणूक दिली जाते. विशेषत: इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये मराठीला दुय्यम मानले जाते. म्हणूनच सरकारने मराठी भाषा सक्तीची केली आहे. शाळांमधून घडलेले विद्यार्थी हे देशाचे भावी आधारस्तंभ असतात. त्यांना मराठी भाषा शिकवण्यावर भर दिल्यास ते चांगल्या प्रकारे शिकू, समजू शकतील. मग मराठीचा डंकाही आणखी वाढेल. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्याच्या दृष्टीनेदेखील हे पाऊल अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यामुळे राज्य सरकारने मराठी सक्तीबाबत घेतलेल्या निर्णयाचे स्वागत व कौतुक करायला हवे.

# कर्जत सार्वजनिक गणेशोत्सव मंडळातर्फे समाजसेवेचा वसा





**खबरबात**
**विजय मांडे**

कर्जत तालुक्यामध्ये ३९ गणेशोत्सव मंडळे आहेत. कर्जत पोलीस ठाण्याच्या हद्दीत २७, नेरळमध्ये १० व माथेरानमध्ये दोन गणेशोत्सव मंडळे कार्यरत आहेत. अगदी ग्रामीण भागात, आदिवासी वाड्यांवरसुध्दा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे सुरू करण्यात आली असून ही मंडळे आपल्या परीने समाजोपयोगी उपक्रम राबवतात. कर्जत सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ ८८ वर्षांपूर्वी स्थापन करण्यात आले आहे. या मंडळाचे विशेष कार्य सर्वश्रुत आहे. विशेष म्हणजे मंडळाचे पदाधिकारी जरी निवडले तरी प्रत्येक जण, अध्यक्ष, सचिव, खजिनदार असल्यासारखे मंडळामध्ये पडेल ते काम अगदी एखादे घरचे कार्य असल्यासारखे करीत असतात.

लोकमान्य टिळकांनी जनजागृतीसाठी सुरू केलेल्या गणेशोत्सवातून समाजप्रबोधन व्हावे. हाही त्यांचा उद्देश होता. लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे सर्वांनी एकत्र येण्यासाठी केली होती. १९३७ साली म्हणजे भारताला स्वातंत्र्य मिळण्याच्या दहा वर्षे आधी कर्जत शहरात सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाची स्थापना झाली. ॲड. भाऊ जोशी यांच्या पुढाकाराने हे मंडळ स्थापन करण्यात आले. त्यानंतर अनेक दिग्गजांनी या मंडळाचे अध्यक्षपद भूषवून मंडळाच्या कार्याचा आलेख सतत चढता ठेवला. या गणेशोत्सव मंडळाने तेंव्हा पासून आजतागायत विविध समाजोपयोगी कार्य करण्यास सुरू आहे. विशेष म्हणजे गेल्या २५-३० वर्षांपासून आरोग्य विषयक उपक्रम राबवून मंडळाच्या पदाधिकारी व सदस्यांनी तालुक्यातील सर्वसामान्य लोकांचे आरोग्य चांगले व्हावे यासाठी प्रयत्नशील आहेत. नेत्र चिकित्सा शिबिर, मोफत आरोग्य शिबीर, दुष्काळग्रस्तांसाठी निधी संकलन, रुग्णवाहिका सेवा, कामोठे येथील एमजीएम हॉस्पिटलच्या माध्यमातून तालुक्यातील जनतेसाठी मोफत आरोग्यसेवा त्यासाठी आरोग्य बससेवा, पाणपोई, कर्जत शहरावरील मुख्य रस्त्यावर सीसीटीव्हीची नजर, पोलीस चौकी, विद्यार्थ्यांच्या सप्तगुणांना वाव मिळण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून त्यांना प्रोत्साहन देणे, पोलीस ठाण्याच्या सहकार्याने २६/११ चे रक्तदान शिबिर, नोकरी मार्गदर्शन केंद्र, नामवंत कलाकारांना गणेशोत्सव काळात आमंत्रित करून त्यांच्या मुलाखती घेणे, कर्जत मधील नवरत्नांचा सन्मान करून त्यांच्या कामाचे कौतुक करणे, संगीत रजनीचे आयोजन असे अनेक विध उपक्रम करून सामाजिक बांधिलकी जपण्याचे काम अविरतपणे सुरू आहे. विशेष म्हणजे श्रींची विसर्जन मिरवणूक एकदम शिस्तबध्द असते.

यामध्ये शहरातील शाळांमधील विद्यार्थ्यांचा मोठ्या प्रमाणात सहभाग असतो. आशिष गोखले, अभिजित मराठे, सदानंद जोशी, निलेश परदेशी, पंकज शहा, मंगेश जोशी, रघुनाथ खैरे, अमित मराठे आदी या उपक्रमांसाठी मेहनत घेत असतात.

१९४५ साली नेरळ गणेशोत्सव मंडळाची स्थापना शिवनाथ गुप्ता, अप्पा बदले यांनी पुढाकार घेऊन केली. काही वर्षांनंतर गणेशोत्सव बंद करून माघी गणेशोत्सव सुरू केला. तो आजतागायत सुरू आहे. नवतरुण ओमकार मित्र मंडळ, दहिवलीचा राजा ४४ वर्षे कोंकण आळी, दहिवली येथे सुरू आहे. किशोर जिनगरे आणि प्रवीण जोशी यांनी हा गणेशोत्सव सुरू केला. आता विजय जिनगरे आणि त्यांचे सहकारी हा उपक्रम करीत आहेत. तालुक्यात सर्वांत उंच श्री गणेशमूर्ती या मंडळाची असते. रक्तदान शिबिर, आरोग्य शिबिर, नेत्र चिकित्सा शिबिर, विद्यार्थ्यांना शालोपयोगी वस्तूंचे वाटप तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रम या मंडळाच्या वतीने आयोजित करून समाजोपयोगी उपक्रम राबविले जातात. पाटील आळी मित्र मंडळ गेली ३८ वर्षे गणेशोत्सव मंडळ सुरू असून विविध देखावे साकारले जातात. भिसेगावकडील जुन्या एस टी स्टँड परिसरात ३८ वर्षांपूर्वी युवक मित्र मंडळाची स्थापना करण्यात आली.

या मंडळाने सुरुवातील विविध उपक्रम राबवून आरोग्य, क्रीडा, सांस्कृतिक कार्यक्रम, गुणवंतांचा सन्मान आदी उपक्रम राबवून मंडळाचे कार्य अबाधित ठेवले. जयदीप मित्र मंडळ गेल्या ३६ वर्षांपासून गणेशोत्सव साजरा करीत आहे. डॉ. सुरेश देशपांडे, डॉ. जोश, विठ्ठल मोरे यांनी हे मंडळ स्थापन केले. १९८९ साली वंदे मातरम् मित्र मंडळाच्या माध्यमातून श्री गणेशोत्सव डॉ. सोहनलाल परमार यांनी सुरू केला. त्यांना योगेश पोथरकर, प्रशांत उगले यांनी साथ दिली. सुरुवातीला काही युवकांचा विरोध होता. मात्र विरोध मावळून तेथील तरुण वर्गाने गणेशोत्सव चांगल्या प्रकारे साजरा होण्यासाठी सहकार्य केले. गेली ३५ वर्ष हे मंडळ सामाजिक उपक्रम करीत आहे.

कर्जत बाजारपेठेतील ओमकार मित्र मंडळ गेली ३० वर्षे कार्यरत आहे. निलेश हरिश्चंद्रे यांनी आपली सहकाऱ्यांच्या बरोबर गणेशोत्सव सुरू केला. हे मंडळ सुध्दा सामाजिक उपक्रम करीत असते. डेक्कन जिमखाना गणेशोत्सव मंडळ पिसोळे सर यांनी पुढाकार घेऊन १९७७ साली स्थापन केले. या परिसरातील बाळ गोपाळाना हाताशी धरून हा गणेशोत्सव चालू केला. मध्यंतरी त्यात खंड पडला. आता पुन्हा नव्या पिढीने त्यात लक्ष घालून गणेशोत्सव सुरू ठेवला आहे. चंडिका मित्र मंडळ आमराई येथे विलास जाधव आणि सहकाऱ्यांनी ३० वर्षांपूर्वी गणेशोत्सव सुरू केला. या मंडळाचे विशेष म्हणजे वर्षभर गणरायाची मूर्ती तेथे असते, मात्र दरवर्षी तिचे रंगकाम केले जाते. दरवर्षी लहान मूर्ती आणि पूजा केली जाते व त्या मूर्तीचे विसर्जन करण्यात येते. पादचारी पूल जवळील सन्मित्र मित्र मंडळाने पंचवीस वर्षांपूर्वी गणेशोत्सव सुरू केला. भिसेगाव बाजूला कर्जत रेल्वे स्थानका लगत क्रांतीनगर मित्र मंडळ गेल्या २५ वर्षांपासून गणेशोत्सव साजरा करतात. गुंडगे येथील सिद्धिविनायक गणेशोत्सव मंडळ गेल्या पंचवीस वर्षांपासून गणेशोत्सव साजरा करीत आहे. चेतन दळवी, चिंचणकर बंधू, सलीम टिवाळे या मुस्लिम बांधवाने पुढाकार घेऊन हा गणेशोत्सव सुरू केला. १७ वर्षे हा उत्सव साजरा होत आहे. दाहिवली येथील भोइराज मित्र मंडळ गणेशोत्सव साजरा करीत असतो.

त्याकाळी सफाई कामगारांकडे गणपती नसल्यामुळे ते कुठे देवदर्शनाला जात नव्हते. म्हणून तत्कालीन नगराध्यक्ष गोपाळराव शिंदे आणि नगरपरिषद मुकादम वसंत मोरे सार्वजनिक गणेशोत्सव सुरू करण्याची संकल्पना नगर परिषद वाचनालयातील सार्वजनिक गणेशोत्सव यांच्या संकल्पनेतून सुरू झाला. तेव्हापासून सर्व सफाई कामगार एकत्र येऊन आनंदाने गणेशोत्सव साजरा करतात. पुढल्या वर्षी या गणेशोत्सवाला ७५ वर्षे पूर्ण होत आहेत. १९७८ साली माथेरान मधील इंदिरा गांधी नगर सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ गणेशोत्सव साजरा करीत आहे. जयराज कळंबे यांच्या संकल्पनेतून हा गणेशोत्सव सुरू झाला. माथेरामध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या वतीने तत्कालीन अधिकारी देशमुख यांनी १९८४पासून गणेशोत्सव सुरू केला होता. ३० वर्षे कर्मचारीवर्ग गणेशोत्सव साजरा केला, परंतु मनुष्यबळाअभावी नऊ-दहा वर्षांपूर्वी गणेशोत्सव बंद करण्यात आला. तसेच अनेक गृहनिर्माण संस्थांमध्ये आता श्री गणेशोत्सव साजरा करण्यात येतो. अशा प्रकारे कर्जत तालुका गणेशोत्सव काळात भक्तीरसात डुंबून जातो.

## बदलते तंत्रज्ञान



# ...तर व्हॉट्सॲप जीमेल, गुगल ड्राइव्हचा डेटा होईल गायब

Google तुम्हाला 15GBपर्यंत मोफत स्टोरेज देते. व्हॉट्सप बॅकअपमध्ये सेव्ह केलेला डेटाचाही यामध्ये समावेश आहे. 15GB ची मर्यादा ओलांडल्यास तुम्ही WhatsApp, Gmail, Google Drive मध्ये फोटो, व्हिडीओ, फाइल्स यांचा बॅकअप घेऊ शकणार नाही.



सध्या सगळ्यांकडेच मोबाईल फोन आहेत, मोबाईल आला की आपल्याकडे व्हॉट्सअप, जीमेलसारखे ॲप्स असतात. या ॲप्सवरील डेटामुळे आपले स्टोरेज लगेच फुल होते. यामुळे आपल्या फोनमधील कमी बॅकअप स्टोरेजबद्दल आपल्याला काळजी असते.

व्हॉट्सपचा बॅकअप घेताना, गुगल ड्राइव्हवर फाइल्स अपलोड करताना किंवा गुगल फोटोमध्ये फोटो आणि व्हिडीओ अपलोड करताना तुम्हाला या समस्येचा सामना करावा लागू शकतो. जेव्हा Googleने दिलेली 15GB क्लाउड स्टोरेजची मोफतची मर्यादा संपते. ही मर्यादा संपली असेल किंवा संपणार असेल, तर Google One तुमच्यासाठी उपयुक्त ठरेल.

Google One प्लॅन अंतर्गत क्लाउड स्टोरेज देते. मात्र, ही योजना थोडी महाग आहे. तुम्हाला डेटाचा बॅकअप घेण्यासाठी जास्त पैसे खर्च करायचे नसल्यास, तुम्ही Google One Lite योजनेचा लाभ घेऊ शकता. तुम्ही ही योजना निवडल्यास, तुम्हाला 30GB ची वाढीव स्टोरेज मर्यादा मिळेल. या प्लॅनमध्ये काही फिचर उपलब्ध नसतील.कंपनी या प्लॅनसाठी एक महिन्याची मोफत चाचणी देखील देत आहे. व्हॉट्सपशिवाय जीमेल, गुगल फोटोज आणि गुगल ड्राइव्हचा बॅकअपही घेता येईल. Google One Lite प्लॅनची किंमत ५९ रुपये प्रति महिना आहे, यामध्ये तुम्हाला 30GB स्टोरेज मिळेल. Google देखील 100GB प्लॅन ऑफर करते, याची किंमत प्रति महिना ११८ रुपये आहे. तुम्हाला हवे असल्यास, तुम्ही Google One Lite प्लॅनची वार्षिक योजना देखील घेऊ शकता.याची किंमत ५८९ रुपये आहे. कंपनी Google One Lite सबस्क्रिप्शनवर काही ऑफर देखील देत आहे. तुमचा डेटा सुरक्षित ठेवण्यासाठी, तुम्ही या स्वस्त पर्यायांचा लाभ घेऊ शकता.

Google One ही एक प्रीमियम योजना आहे, यात 2TB क्लाउड स्टोरेज ऑफर करते. यात नवीन AI फिचर आहेत, Gemini AI सपोर्ट आणि Google Photos मधील मॅजिक एडिटर फिचर आहेत. यासाठी दरमहा १,९५० रुपये खर्च करावे लागतील.

# शास्त्रीय गायिका केसरबाई केरकर



**निमित्त**

हिंदुस्थानी संगीतशैलीतील जयपूर-अत्रौली घराण्याच्या ख्यातनाम मान्यवर गायिका केसरबाई केरकर यांचा आज स्मृतीदिन आहे. त्यांचा जन्म गोव्यातील केरी (तालुका फोंडा) या गावी गोमंतकातील संगीतपरंपरा असलेल्या कुटुंबात झाला. त्यांच्या आईचे नाव भीमाई होते. लहानपणी गावात होणाऱ्या गवळणकाला (श्रीकृष्णाच्या बाललीलांवर आधारलेली मुलींनी केलेली नाटिका) उत्सवात त्या श्रीकृष्णाची भूमिका करत. त्यांची भूमिका पाहण्यासाठी व गायन ऐकण्यासाठी परगावांहूनही लोक येत असत.


वयाच्या आठव्या वर्षी कोल्हापूर येथील वास्तव्यात त्यांनी किराणा घराण्याचे उ. अब्दुल करीमखाँ यांच्याकडे गायन शिकायला आरंभ केला. ही तालीम दहा महिने चालली. पुढे गोव्यातील लामगाव व बांदोडे येथे ग्वाल्हेर घराण्याचे पं. रामकृष्णबुवा वझे यांच्याकडे सुमारे तीन वर्षे त्रुटित स्वरूपाचे शिक्षण घेतले. १९०८ साली आई व मामाबरोबर त्या मुंबईस आल्या. तेथे प्रसिद्ध बीनकार व सतारीये उ. बरकतुल्लाखाँ यांच्याकडे १९१५ पर्यंत त्या गायन शिकल्या. १९१२ साली उ. अल्लादियाखाँ यांच्याकडूनही अल्पकाळ संगीतशिक्षण मिळाले. सुमारे चार महिने पं. भास्करबुवा बखले यांचीही तालीम त्यांना मिळाली. दरम्यान हिरालाल यांच्याकडून कथ्थक नृत्य व मँझलेखाँ यांच्याकडून अदाकारीच्या ठुमरीची तालीम त्यांनी घेतली. १९१७ पर्यंत वरील सर्व गुरूंकडून काहीशी खंडित स्वरूपाची तालीम त्यांना मिळाली. गायन शिकण्याची तीव्र इच्छा असूनही दीर्घकाळ कोणत्याच गुरूकडे सलग शिक्षण न झाल्याने त्या व्यथित होत्या.

१९१८ साली झालेल्या एका घटनेने केसरबाईंच्या संगीतशिक्षणाच्या इच्छेस जिद्दीचे स्वरूप आले. एका संगीत मैफलीतील अपमान जिव्हारी लागल्याने त्यांनी उत्तम तालीम प्राप्त करून गायनात प्रभुत्व मिळवण्याचा चंग बांधला. जयपूर-अत्रौली घराण्याच्या अल्लादियाखाँसाहेबांकडे तालीम घेण्यासाठी त्यांनी प्रयत्न सुरू केले. अखेरीस सेठ विठ्ठलदास द्वारकादास यांच्या मध्यस्थीने खाँसाहेबांनी काही अटी घालून शिकवायचे कबूल केले. १ जानेवारी १९२१ रोजी गंडाबंधन समारंभ होऊन केसरबाई खाँसाहेबांच्या रीतसर शागीर्द झाल्या. त्यांना खाँसाहेबांकडून अत्यंत सक्त व शिस्तशीर तालीम मिळाली. त्यांच्याकडून अनेक आम व खास राग तसेच बंदिशींची तालीम मिळाल्यावर केसरबाई मैफलींत प्रस्तुती करू लागल्या.

केसरबाई अत्यंत मानी होत्या. हा स्वभाव अनेकांना सकृद्दर्शनी आत्मप्रौढीचा वाटे. मात्र कोणत्याही बाबतीत सवंगपणा, हीणकसपणा त्यांना मान्य नव्हता. व्यावसायिक ध्वनिमुद्रणे, रेडिओवरून गायन त्यांना पसंत नव्हते. मात्र हिज मास्टर्स व्हॉइसचे ध्वनिमुद्रण अधिकारी, गायक जी. एन. जोशी यांनी मोठ्या मिनतवारीने केसरबाईंना राजी केले आणि मग हिज मास्टर्स व्हॉइस आणि कोलंबिया या ध्वनिमुद्रणसंस्थांसाठी त्यांनी ध्वनिमुद्रणे केली.

मुंबईतील शिवाजी पार्क येथील आपल्या दुमजली बंगल्यात त्यांचे वास्तव्य होते. उतारवयात त्यांनी धोंडूताई कुलकर्णी यांना तालीम दिली. धोंडूताई या केसरबाईंच्या एकमात्र शिष्या होत. मुंबई विद्यापीठाच्या संगीत विभागाचे उद्घाटन केसरबाईंच्या हस्ते तानपुरा छेडून करण्यात आले होते. संगीत नाटक अकादमी - प्रमुख आचार्या (१९५३), पद्मभूषण (१९६९, भारत सरकार), राज्यगायिका (१९६९, महाराष्ट्र राज्य) इत्यादी सन्मान त्यांना लाभले. मुंबई येथे केसरबाई यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. **(साभार : इंटरनेट)**

**क्लिक...क्लिक...!**



**छत्रपती संभाजीनगर : वैजापूर तालुक्यातील धोंदलगाव येथे महावितरणच्या उपकेंद्रापासून सुमारे साडेतीन किलोमीटर अंतरावर असलेल्या १३ एकर शासकीय जमिनीवर सौरऊर्जा प्रकल्प उभारण्यात आला आहे. त्याचे ड्रोनच्या सहाय्याने घेतलेले छायाचित्र.**

## आरोग्य प्रहर

# तारुण्यातच हृदय होतेय कमजोर; विकार वाढले

एकेकाळी हृदयाचा आजार केवळ वृद्धांना व्हायचा. परंतू अलिकडील आपले रहाणीमान बदल्याने वाढता ताण-तणाव, बैठी कामाची शैली यामुळे शारीरिक हालचाली कमी झाल्याने ऐन तारुण्यात हृदयविकाराचे आजार होऊ लागले आहेत.

तिशीतच का बायपास सर्जरीची वेळ का येत आहे. यापूर्वी ५० वा ६० या वयात बायपास सर्जरीची व्हायची आता तिशीतच ही वेळ येत असल्याने जर विमा नसेल तर कुटुंबच आर्थिक संकटात सापडत आहे.



हृदयाला रक्त पुरविणाऱ्या रक्त पुरविणाऱ्या रक्तवाहिन्यांमध्ये ब्लॉकेज तयार झाल्यानंतर बायपास सर्जरीचा सल्ला डॉक्टरांकडून दिला जात असतो. हार्ट अटॅक आल्यानंतर किंवा हार्ट ॲटॅकच्या धोक्यापासून वाचण्यासाठी डॉक्टर बाय पास सर्जरीचा सल्ला देतात. हार्टमधील नसांमध्ये ब्लॉकेज कोलेस्ट्रॉलमुळे देखील होत असतो. तसेच रक्ताची गुठली झाल्याने देखील हृदयाचा रक्त पुरवठा बंद पडू शकतो. त्यामुळे बायपास सर्जरीचे प्रमाण खूपच वाढले आहे.

जेवणाच्या वाईट सवयी आणि बिघडलेली जीवनशैली यामुळे देखील हृदयासंबंधित आजाराचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढल्याचे राजीव गांधी हॉस्पिटलचे कार्डीओजी विभागाचे डॉ.अजित कुमार यांनी म्हटले आहे. बदलती जीवन शैली, व्यायामाचा अभाव आणि धूम्रपान आणि दारुचे व्यसन यामुळे हृदय विकाराचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. त्यामुळे अलिकडे तिशीत हार्ट ॲटॅक येण्याचे प्रमाण खूपच वाढल्याचे गुरुग्राम येथील नारायणा हॉस्पिटलचे प्रोग्रॅम हेड कार्डियक सायन्सेसचे डॉ. हेमंत मदान यांनी म्हटले आहे.

मानसिक तणाव, अपुरी झोप याचा देखील हृदयावर मोठा परिणाम होत आहे. त्यामुळे हृदय विकाराचे प्रमाण वाढले आहे. हार्टच्या आजाराविषयी लोकांमध्ये जागरुकता नाही. छातीत दुखू लागल्यावर अचानक धाप लागण्याच्या तक्रारीकडे लोक दुर्लक्ष करतात. लोकांना गॅसेस किंवा एसिडीटीचा त्रास वाटतो. परंतू याकडे दुलर्क्ष करु नये असे दिल्लीच्या आरएमएल हॉस्पिटलमध्ये कार्डिओलॉजी विभागातील प्रोफेसर डॉ.तरुण कुमार यांनी म्हटले आहे.

कमी वयात हार्ट अटॅक येण्याची कारणासाठी ब्लड प्रेशर देखील जबाबदार आहे. जामा जर्नलच्या साल २०२१मधील एक संशोधनात म्हटले आहे की भारतात चार पैकी एका व्यक्तीला ब्लड प्रेशरच्या आजाराने ग्रस्त आहे. यातील ३० टक्के लोक कमी वयाचे आहेत.

# राज्यात पुन्हा महायुतीचेच सरकार येणार

## ◆ खासदार सुनील तटकरे यांनी निजामपुरात व्यक्त केला विश्वास



**माणगाव : प्रतिनिधी**

राज्यात पक्षाच्या कार्यक्रमानिमित्ताने फिरत असताना लाडकी बहीण योजनेचा प्रभाव सर्वत्र दिसून येत आहे. हे चित्र पाहता राज्यात पुन्हा एकदा महायुतीचेच सरकार १०० टक्के येणार असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी निजामपूर येथील कार्यक्रमात व्यक्त केला.

राष्ट्रवादी काँग्रेस निजामपूर विभागाच्या वतीने खासदार सुनील तटकरे यांच्यासह नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा नागरी सत्कार सोहळा रविवारी (दि.१५) निजामपूर विभागीय अध्यक्ष संदीप जाधव यांच्या अध्यक्षतेखाली व माणगाव पं. स. माजी उपसभापती तुकाराम सुतार यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमास रायगड जिल्हा युवक उपाध्यक्ष अनंता महाडिक, पं. स. माजी उपसभापती संतोष लाड, ज्येष्ठ नेते शरद सावंत, निजामपूर शहराध्यक्ष महेश शिर्के, विभागीय सचिव किरण पागार, उणेगावचे माजी सरपंच राजेंद्र शिर्के, निजामपूर महिलाध्यक्ष देविका पाबेकर, कासार गुरुजी, साळवे माजी सरपंच संजय शिंदे, पाणसई विभाग अध्यक्ष भिकूशेठ धाडवे, किशोर तोंडलेकर, सागर खानविलकर, घनःश्याम तटकरे, शिवा घाग आदींसह कार्यकर्ते, पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या वेळी रायगड जिल्हा नवनियुक्त कार्याध्यक्ष सुभाष केकाणे, जिल्हा नियोजन मंडळावर सदस्यपदी निवड झालेले बाबूशेठ खानविलकर, नवनियुक्त माणगाव तालुकाध्यक्ष काका नवगणे, नवनियुक्त जिल्हा मुख्य समन्वयक राजू मोरे यांचा सत्कार करण्यात आला.

या वेळी महाड विधानसभा मतदार संघाचे अध्यक्ष बाबूशेठ खानविलकर यांनी, निजामपूर विभागात तटकरे साहेबांच्या माध्यमातून अनेक विकासाची कामे मार्गी लागली असून जी काही प्रलंबित विकास कामे आहेत तीदेखील मार्गी लावली जावीत, असे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निजामपूर सचिव किरण पागार यांनी केले.

# आईच्या हत्येप्रकरणी आरोपी मुलगी आणि प्रियकराला पोलीस कोठडी

## खालापूरच्या परखंदे येथील घटना

**खालापूर : प्रतिनिधी**

प्रियकरासोबत आक्षेपार्ह स्थितीत आईने पाहिल्याने मुलीने प्रियकराच्या मदतीने आईचा गळा दाबून हत्या केल्याची घटना खालापूर तालुक्यातील परखंदे अहिल्यानगर गावात घडली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी मुलगी व तिच्या प्रियकराला अटक करून न्यायालयात हजर केले असता त्यांना १८ सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

संगीता मारुती झोरे (वय ४२) या दोन मुलींसह परखंदे अहिल्यानगर गाव येथे राहत होत्या. मंगळवारी पहाटे ४.३०वा.च्या सुमारास संगीता यांना अचानक झोपेतून जाग आली. त्या वेळी संगीताची मोठी मुलगी भारती (वय २०) ही तिचा प्रियकर संतोष दत्तात्रय नांदगावकर (वय ३४ रा. वावोशी खालापूर)सोबत आक्षेपार्ह स्थितीत असताना संगीता यांनी पाहिले. त्यांनी आरडाओरड करण्यास सुरुवात केल्यावर संतोष नांदगावकर याने संगीताचे तोंड दाबून जमिनीवर खाली पाडले व त्यांच्या तोंडावर घरातील ब्लँकेट दाबून धरले. मुलगी भारतीने आई संगीताचे पाय धरुन ठेवले. श्वास कोंडल्याने संगीता यांचा मृत्यू झाला.

भारती आणि संतोषने पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने संगीताचा मृतदेह साडीने घराचे छताचे लोखंडी पाईपला लटकवला व त्याठिकाणी लाकडी स्टुल ठेवून आत्महत्या केल्याचा बनाव रचला, परंतु खूनाची घटना पाहिलेल्या संगीता यांची दुसरी मुलगी सुरेखा (वय १८) हिने घडलेला सर्व प्रकार नातेवाईकांना सांगितल्यानंतर खालापूर पोलीस ठाण्यात भारती झोरे आणि तिचा प्रियकर संतोष नांदगावकरविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी दोघांनाही अटक केली आहे.

या दोघांनाही १८ सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. अधिक तपास खालापुर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन पवार करीत आहेत.

# मुरूडमध्ये शॉक लागून वीज कर्मचारी जखमी

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूडमधील कोळीवाडा परिसरातील वीजपुरवठा सुरळीत करीत असताना वीज कर्मचारी सिद्धेश भायदे यांना शॉक लागून ते २० फुटांवरून खाली पडले. यात ते जखमी झाले असून त्यांच्यावर ग्रामीण रुणालयात उपचार सुरू आहेत.



समुद्रकिनारी महावितरण विभागाची वीजवहिनी भूमिगत करण्यात आली आहे. या विद्युत वहिनीमध्ये बिघाड होऊन कोळीवाडा परिसरातील वीजपुरवठा खंडित झाला. वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी सिद्धेश भायदे हे पोलवर दुरूस्तीसाठी चढले होते. त्याच दरम्यान वीजपुरवठा सुरू राहिल्याने त्यांना जोरदार शॉक बसल्याने ते २० फुटांवरून खाली पडले. त्यांना तातडीने मुरूड ग्रामीण रुग्णालयात दाखल करून पुढील उपचारासाठी अलिबाग सिव्हिल हॉस्पिटल येथे हलवण्यात आले आहे.

याबाबत महावितरणचे उपमुख्य कार्यकारी अभियंता कृष्णात सुर्यवंशी यांनी, नगर परिषदेने येथील अंतर्गत काम करताना महावितरणला विश्वासात घेणे आवश्यक आहे. सुशोभिकरण करताना अंतर्गत वहिनीला इजा पोहचल्याने येथील विद्युत पुरवठा खंडित होत आहे. त्यामुळे नगर परिषदेने सदरचे काम व्यवस्थित करणे आवश्यक आहे, असे सांगितले.

# विसर्जनाला गेलेल्या गणेशभक्तांवर मधमाशांचा हल्ला

**तळा** : तालुक्यातील हनुमान नगर येथे गणपती विसर्जनासाठी गेलेल्या गणेशभक्तांवर मधमाशांनी हल्ला चढवल्याने खळबळ उडाली.

हनुमान नगर येथील ग्रामस्थांकडून आपल्या लाडक्या गणरायाला निरोप देण्यासाठी गावातून वाजतगाजत मिरवणूक काढण्यात आली होती. या मिरवणुकीत गावातील सर्व ग्रामस्थ, महिला व लहान मुले मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. विसर्जन मिरवणूक खाडीकिनारी विसर्जनासाठी आली असता काहीही कळायच्या आत अचानक उठलेल्या मधमाशांनी विसर्जन मिरवणुकीतील भाविकांवर एकच हल्ला चढवला. मधमाशांनी जवळपास १५ ते २० भाविकांना दंश केला. ज्यामध्ये लहान मुलांचादेखील समावेश होता. सर्वांना तातडीने तळा प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी दाखल करण्यात आले. वैद्यकीय अधिकारी डॉ. अमोल मोघे यांनी जखमींवर उपचार करून काहींना सोडून दिले.

# शेतकऱ्यांना श्रींच्या आरतीचा मान

## रोहा भुवनेश्वर येथील जय गणेश मित्र मंडळाचा पुढाकार

**धाटाव : प्रतिनिधी**

बळीराजा फाउंडेशनच्या शेतकऱ्यांना जय गणेश मित्र मंडळ भुवनेश्वरतर्फे गणरायाची आरती करण्याचा बहुमान मिळाला. शेतकऱ्यांना श्री गणेशाच्या आरतीचा मान देत पुढाकार घेण्याच्या उपक्रमाबद्दल जय गणेश मित्र मंडळाचे सर्वत्र कौतुक होत आहे.



भुवनेश्वर (वरसे) येथील जय गणेश मित्र मंडळातर्फे सामाजिक कार्याला नेहमीच प्राधान्य दिले जाते. २४ वर्षे मंडळाने सातत्याने रक्तदान शिबिर, शैक्षणिक कार्यक्रम, सामाजिक सेवाभावचा वसा कायम ठेवला. बळीराजा फाउंडेशनच्या शेतकऱ्यांना रविवारी आरतीचा मान दिला. अध्यक्ष विठ्ठल मोरे, संस्थापक राजेंद्र जाधव, उपाध्यक्ष तुकाराम भगत, सचिव ॲड. दीपक भगत, खजिनदार रुपेश साळवी व पदाधिकारी शेतकरी उपस्थित होते. या वेळी राजेंद्र जाधव यांनी मंडळाच्या परंपरेचे कौतुक केले.

# पेण औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत संविधान मंदिराचे उद्घाटन

## आमदार रविशेठ पाटील यांची प्रमुख उपस्थिती



**पेण : प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय लोकशाही दिनाचे औचित्य साधून पेण तालुक्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत आमदार रविशेठ पाटील यांच्या हस्ते संविधान मंदिराच्या उद्घाटनाची फित कापून अनावरण करण्यात आले.

या वेळी पेण एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष ॲड. मंगेश नेने, नायब तहसीलदार प्रसाद कालेकर, इंजिनियर आर. बी. माने, पेण पोलीस ठाण्याचे एपीआय निलेश रजपूत, प्राचार्या विद्या पाटील यांच्यासह प्रशिक्षण संस्थेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# समुद्रकिनारी जेलीफिशचा वावर

**अलिबाग** : समुद्रकिनारी जेलीफिश मोठ्या प्रमाणात येत असल्याने मच्छिमारांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.

गणपती विसर्जनाच्या वेळीही समुद्रात उतरलेल्या गणेशभक्तांनाही जेलीफिश दंश झाल्याचे समोर आल्याने विसर्जनासाठी जाणाऱ्यांना दक्षता घेण्याचे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे. पावसाळ्यात ब्ल्यू बॉटल जेलीफिश किनाऱ्यावर येतात. खोल समुद्रातील वातावरणाच्या बदलामुळे हे जेलीफिश समुद्रकिनारी येतात. जेलीफीश आले म्हणजे मासे कमी मिळणार अशा मच्छिमारांचा वर्षानुवर्षाचा ठोकताळा असल्याचे ज्येष्ठ मच्छिमार जाया सारंग यांनी सांगितले.

# माथेरानमधील महिला जपताहेत भजनाचा वारसा

**माथेरान : प्रतिनिधी**

आत्ताच्या युगात जुन्या परंपरा, रूढींचा विसर पडत चालला आहे. याकरिता माथेरानमधील काही महिलांनी एकत्रित येऊन बाळ राधिका भजन मंडळाची स्थापना करून अध्यात्मिक वारसा पुढे नेण्यासाठी प्रयत्न सुरू केला. मागील पाच वर्षांपासून त्याला उस्फूर्तपणे यश मिळत आहे.

या महिला मंडळाच्या अध्यक्षा श्रद्धा मढये नेरळ (वारे) गावातून लग्न झाल्यावर माथेरान येथे सासरी आल्यावर त्यांना इथली भौगोलिक परिस्थिती लक्षात आली. येथे गणेशोत्सव काळात फक्त पुरुष मंडळीच १० दिवस भजनाचे कार्यक्रम करतात. त्यांना स्वतःला गायनाची आवड असल्यामुळे त्यांनी ठराविक महिलांना एकत्रित करून २०१८मधील गणेशोत्सव काळात बाळ राधिका भजन मंडळ स्थापन केले.

हे मंडळ मागील पाच वर्षांपासून गावात आपला कार्यक्रम सादर करीत असून त्यांना उस्फूर्तपणे पाठिंबा मिळत आहे. याबद्दल महिला भजन मंडळाचे माथेरानमध्ये सर्वत्र कौतुक होत आहे. या सर्वच महिलांना घरातून पाठिंबादेखील मिळत आहे. ठराविक भजनाचे साहित्य घेऊन या महिला आपले कार्यक्रम करीत आहेत.

यासाठी त्यांना निशा पार्टे, गीता रांजाणे, अनिता मोरे, संगीता जाबरे, जयश्री मालुसरे, राजेश्री मालुसरे,रिया दळवी, रेणुका मालुसरे अशा अनेक महिलांची साथ लाभत आहे.

कार्यक्रमाच्या माध्यमातून मिळालेल्या रकमेतून आपल्या भजनाचे साहित्य घेणे आणि उर्वरित रकमेचा वापर गरीब गरजवंत विद्यार्थ्यांना मदतीसाठी करतात, तसेच आत्मिक सुखासाठी तरुणींनी पुढाकार घेणे आवश्यक असल्याचे बाळ राधिका भजन मंडळाच्या अध्यक्षा श्रद्धा मढये यांनी सांगितले.




## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

मुदतवाढ सूचना

**ई निविदा सूचना क्र. २७/२०२४-२०२५ (मुंबई) करीता**

दिनांक २२/०८/२०२४ रोजी दैनिक नवाकाळ, मुंबई, दैनिक मिड डे, मुंबई, दैनिक नवभारत, मुंबई, दैनिक खबरें आजतक, मुंबई, दैनिक रामप्रहर, रायगड या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या वरील ई निविदा सूचनेतील खालील कामाकरीता कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण / महामंडळाचा खुलास व ई निविदा **संकेतस्थळावर उपलब्धतेबाबत महामंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्धतेबाबत मुदतवाढ सूचना देण्यात येत आहे.**

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | अलिबाग विभागासाठीच्या पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती.... नागोठणे जॅकवेल ते आरसीएफ कंपनी दरम्यानच्या सेवा रस्त्यावरील पुलांचे मजबुतीकरण व दुरुस्ती एफआरसीएम प्रक्रिये सह करणे. | ₹ १९,१९,३०,१०५.०० |

उपरोक्त कामांकरीता निविदा प्रपत्र दिनांक २०/०९/२०२४ पर्यंत महामंडळाच्या http://www.midcindia.org या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

आता कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक १८/०९/२०२४ पासून **महामंडळाच्या संकेत स्थळावर उपलब्ध होईल.**

ज्या निविदा धारकांनी यापूर्वी आपली निविदा भरली असेल अथवा अपलोड केली असेल, त्यांनी निविदेमध्ये बदल करुन किंवा बदल न करता सदर निविदा पुन्हा भरणे आवश्यक आहे, याची कृपया नोंद घ्यावी, अशा कंत्राटदारांनी शुद्धिपत्रकानंतर जर निविदा पुन्हा भरली नाही अथवा अपलोड केली नाही तर त्यांचा देकार सदर स्पर्धात्मक निविदेतून आपोआप बाद होईल.

सदर निविदा सूचनेत इतर कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

मुदतवाढ सूचना

**ई निविदा सूचना क्र. ३३/२०२४-२०२५ (मुंबई) करीता**

दिनांक ०७/०९/२०२४ रोजी दैनिक आपलं महानगर, मुंबई, दैनिक एक्टिव्ह टाईम्स, मुंबई, दैनिक नवभारत, मुंबई, दैनिक खबरें आजतक, मुंबई, दैनिक रामप्रहर, रायगड या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या वरील ई निविदा सूचनेतील खालील कामाकरीता कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण / महामंडळाचा खुलास व ई निविदा **संकेतस्थळावर उपलब्धतेबाबत महामंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्धतेबाबत मुदतवाढ सूचना देण्यात येत आहे.**

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | शहापूर धेरंड औद्योगिक क्षेत्र... मोठे शहापूर, धाकटे शहापूर व धेरंड या गावांना पायाभूत सुविधा पुरवणे | ₹ ६,७३,९५,५६७.०० |

उपरोक्त कामांकरीता निविदा प्रपत्र दिनांक २०/०९/२०२४ पर्यंत महामंडळाच्या http://www.midcindia.org या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

आता कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक १८/०९/२०२४ पासून **महामंडळाच्या संकेत स्थळावर उपलब्ध होईल.**

ज्या निविदा धारकांनी यापूर्वी आपली निविदा भरली असेल अथवा अपलोड केली असेल, त्यांनी निविदेमध्ये बदल करुन किंवा बदल न करता सदर निविदा पुन्हा भरणे आवश्यक आहे, याची कृपया नोंद घ्यावी, अशा कंत्राटदारांनी शुद्धिपत्रकानंतर जर निविदा पुन्हा भरली नाही अथवा अपलोड केली नाही तर त्यांचा देकार सदर स्पर्धात्मक निविदेतून आपोआप बाद होईल.

सदर निविदा सूचनेत इतर कोणताही बदल करण्यात आलेला नाही.






## गणेश दर्शन






पनवेल : गणेशोत्सवानिमित्त आमदार प्रशांत ठाकूर आणि भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी कळंबोली, कामोठ्यासह तालुक्यातील सार्वजनिक आणि घरगुती विराजमान झालेल्या गणरायाचे मनोभावे दर्शन घेतले. त्यांचे स्वागत करण्यात आले. सोबत इतर मान्यवर





पनवेल : भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी करंजाडे येथे दुर्वेश राजेश गायकर आणि ज्येष्ठ नेते कर्णा शेलार यांच्या घरातील गणरायाचे दर्शन घेतले. त्यांचे स्वागत करण्यात आले. या वेळी सरपंच मंगेश शेलार उपस्थित होते.



उरण : कामगार नेते सुरेश पाटील यांनी जासई हायस्कूलचे प्राचार्य अरुण घाग यांच्या घरातील गणरायाचे दर्शन घेतले. या वेळी नुरा शेख, डी.पी. सोनावणे, मनमोहनदास महाराज, ठाकरे सर, राजेंद्र घरत आदी उपस्थित होते.



अ‍ॅड. पौर्णिमा व गणेश घुगे, आदई, पनवेल



ओमकार व स्वरूपा संतोष खाडे, माथेरान, ता. कर्जत



नवतरुण ओमकार मित्र मंडळ, कोकण आळी दहिवली, कर्जत.



रवींद्र मैलुरकर व प्रिया मैलुरकर, खांदा कॉलनी, पनवेल



उरण पोलीस ठाण्यातील विराजमान बाप्पा.



आप्पा जाधव, खांदा कॉलनी, पनवेल



अरुणोदय गणेशोत्सव मंडळ, नेरूळ सेक्टर १०, नवी मुंबई




पनवेल : अभिनव युवक मित्र मंडळ पायोनिअर विभाग यांच्या श्री पायोनिअरचा राजा गणपती उत्सवानिमित्त रविवारी चित्रकला स्पर्धा व मोफत आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. चित्रकला स्पर्धेत लहान मुलांसह अनेकांनी भाग घेतला, तर मिरॅकल मेडिकल आणि बियोंडचे किरण पाटील यांनी भरवलेल्या मोफत आरोग्य तपासणी शिबिराचा शंभरहून अधिक स्थानिक रहिवाशांनी लाभ घेतला.



पनवेल : दरवर्षीप्रमाणे यंदाही येथील लोहमार्ग पोलीस ठाण्याच्या वतीने गणेशोत्सवानिमित्त श्री सत्यनारायणाची महापूजा शनिवारी आयोजित करण्यात आली होती. या वेळी माजी नगरसेविका दर्शना भोईर, तसेच सपना पाटील, अरुणा पाटील, जयश्री कामरकर, कविता पाटील यांनी पूजेचे दर्शन घेतले.

# रिलायन्स टाऊनशिपमध्ये लाखोंच्या ऐवजाची चोरी

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

लोधिवली येथील रिलायन्स टाऊनशिपमधील दोन घरांमध्ये लाखो रूपयांची चोरी झाल्याची घटना घडली आहे.

या बाबतीत विशेष वृत्त असे की, लोधिवली येथील रिलायन्स टाऊनशिपमध्ये सेक्टर बी मध्ये राहणारे जनार्दन श्रावण पाटील व विनय सिंग हे गणपती सणानिमित्त गावाला गेले होते. या वेळी अज्ञात चोरट्यांनी जनार्दन पाटील यांच्या घरात प्रवेश करून साडेपाच लाख रुपये रोख व सोन्याचे दागिने असा ऐवज लंपास केला. तर त्यांच्या शेजारी राहणाऱ्या विनय सिंग यांच्या घरातील कपाट फोडून कपाटातील लाखो रूपयांची रोकड आणि सोन्याचे दागिने चोरले. या बाबतीत जनार्दन पाटील आणि विनय सिंग यांनी खालापूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असता अज्ञात चोरट्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास सुरू आहे.

लोधिवली रिलायन्स टाऊनशिपमध्ये मोठ्या प्रमाणात सुरक्षारक्षक तैनात असतानाही एवढी मोठी चोरी कशी झाली याबाबत आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

# पद्मश्री डॉ. रत्नाप्पा कुंभार यांची जयंती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

प्रजापती समाज विकास मंडळ या राष्ट्रीय सामाजिक संस्था एनजीओच्या वतीने रविवारी (दि.१५) संविधान सभेचे सदस्य, स्वातंत्र्यसैनिक, माजी खासदार, माजी मंत्री, पद्मश्री डॉ. रत्नाप्पा यांची जयंती पनवेल, नवी मुंबई येथेही उत्साहात आणि श्रद्धेने साजरी करण्यात आली.



या वेळी उपस्थित मान्यवरांनी आपल्या निवेदनातून डॉ. रत्नाप्पा कुंभार यांचे चरित्र व त्यांनी केलेल्या सामाजिक कार्यावर प्रकाश टाकला. डॉ. रत्नाप्पा कुंभार हे संविधान सभेचे सदस्य होते आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासमवेत संविधान निर्मितीत सहभागी होते तसेच संविधानाच्या मसुद्यावर स्वाक्षरी करणाऱ्यांपैकी ते प्रामुख्याने होते अशी माहिती आहे. त्यांच्या सामाजिक आणि चांगल्या कामांसाठी त्यांना पद्मश्री पुरस्कारानेही सन्मानित करण्यात आले. लोक त्यांना देशभक्त रत्नाप्पा कुंभार म्हणून ओळखतात.

या वेळी राष्ट्रीय अध्यक्ष चंद्रप्रताप प्रजापती, मुख्य सरचिटणीस विनोदकुमार प्रजापती, नवीन पनवेल अध्यक्ष गोवर्धन प्रजापती, पनवेल शहर अध्यक्ष राजेंद्र प्रजापती, संजय कुंभार, इंदर प्रजापती, रोहित प्रजापती, संजय प्रजापती, सियाराम प्रजापती, प्रियांश प्रजापती आदी उपस्थित होते.

# गणेशोत्सवामुळे रायगड जिल्ह्यात कोट्यवधींची उलाढाल

## व्यावसायिकांमध्ये समाधानाचे वातावरण



**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

रायगडात सध्या गणेशोत्सवाची धामधूम सुरू आहे. पाच दिवसांच्या गौरी, गणपतीचे गुरुवारी विसर्जन करण्यात आले. अजूनही सार्वजनिक गणेशोत्सव जोरात सुरू राहणार आहे. या गणेशोत्सवामुळे रायगडमध्ये छोट्या-मोठ्या व्यावसायिकांना उभारी मिळाली असून कोट्यवधींची उलाढाल झाली आहे.

गणेशोत्सव हा सर्वांचाच आवडीचा आणि भक्तीभावाने साजरा होणार सण आहे. गणपतींच्या मूर्तींचे माहेरघर म्हणून संपूर्ण महाराष्ट्रात प्रसिद्ध असलेल्या पेणच्या गणपती मूर्ती कारखान्यांमधून या वेळीही मोठी उलाढाल झाली. २५ ते ३० लाख मूर्तींची निर्मिती होऊन त्या सर्व मूर्तींची संपूर्ण राज्यासह देशात, विदेशातही विक्री झाली. विशेष म्हणजे या वेळी महिला बचत गटानीही मूर्ती निर्मिती आणि खरेदी, विक्रीत सहभाग नोंदविला.

किरकोळ दुकानदारांनाही या गणेशोत्सवात हाताला काम मिळाले. महिलांनीही तयार पदार्थांची निर्मिती करीत कुटुंबाला आर्थिक हातभार लावला.

गणेशोत्सवामुळे रायगडच्या सर्वच बाजारपेठांमध्ये कमालीचे चैतन्य जाणवत आहे. गेले महिनाभर विविध वस्तूंच्या खरेदी, विक्रीची उलाढाल झाली आहे. पुढील दोन दिवसही ही उलाढाल अशीच सुरू राहणार आहे. या खरेदी विक्रीमुळे घरोघरी विविध प्रकारच्या वस्तुंची खरेदीही झाल्याचे दिसून आले. फळे, फुले विक्रेते, पुरोहित, ब्राह्मण, सुपांची निर्मिती करणारे, रानभाज्या विकणारे या सर्वसामान्य घटकांनाही उभारी मिळाली आहे.

## निवडक

### आयुर्वेदिक चिकित्सा शिबिराला प्रतिसाद



**कर्जत :** सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ आयोजित माजी आमदार स्व. तुकाराम सुर्वे प्रतिष्ठान, ज्योविस आयुर्वेद, नारी सामाजिक संस्था यांच्या सहकार्याने आयुर्वेदिक चिकित्सा शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिरात २७८ रुग्णांची तपासणी करण्यात आली. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे जोशी, सदानंद जोशी, अभिजीत मराठे, मंगेश जोशी, निलेश परदेशी, डॉ. ज्योती सातपुते, डॉ. मणिशंकर गुप्ता, स्व. आमदार तुकाराम सुर्वे प्रतिष्ठानचे मुकेश सुर्वे, मनीषा सुर्वे, पोलीस उपनिरीक्षक बाबू धबडे, वसंत ठाकूर, भानुदास ठोंबरे, आयेशा वाडकर, ज्योती पाटील, वैशाली ठाकरे, विजयकुमार गोखले, पांडुरंग देशमुख, वसुधा ठाकूर, यश सुर्वे, रघुनाथ खैरे, धनंजय बेडेकर, योगेश देशमुख, अरुण निघोजकर, पद्मजा देशमुख, शिल्पा कदम आदी उपस्थित होते.

### माथेरानमध्ये आयुष्यमान भारत कार्डवाटप



**माथेरान :** माथेरान प्रेस क्लबच्या वतीने स्व. संतोष पवार यांच्या स्मरणार्थ आयुष्यमान भारत कार्डचे वाटप करण्यात आले होते. स्मृतींना उजाळा देण्यासाठी या शिबिराचे आयोजन केले होते. जिल्हाधिकारी कार्यालयाचे सीएससी जिल्हा व्यवस्थापक अक्षय गिरी यांच्या प्रयत्नातून हे शिबिर झाले. एकूण २५ लोकांचा स्टाफ याकामी लागलेला दिसून आला. डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी स्वतः या शिबिराची पाहणी केली. ४५०पेक्षा जास्त लोकांनी या शिबिराला भेट दिली. ज्यांचे कार्ड तयार झाले त्यांना डॉ. ओमप्रकाश शेटे यांच्या हस्ते वितरित करण्यात आले.

### वाहतूक पोलिसांची धडक कारवाई

**अलिबाग :** बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्यांची संख्या वाढली आहे. जिल्ह्यातील २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतूक शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी शनिवारी (दि.१४) वाहतुकीचे नियमभंग करणाऱ्या एकूण १३८ चालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. त्यांच्याकडून एक लाख १३ हजार रुपये इतका दंड आकारला आहे.

## नागोठणे आयटीआयमध्ये संविधान मंदिराचे उद्घाटन



**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे आयटीआय कॉलेजमध्ये सरपंच सुप्रिया महाडिक व नागोठणे आयटीआय कॉलेजचे चेअरमन सुनील कदम यांच्या हस्ते संविधान मंदिराचे उद्घाटन रविवारी (दि.१५) करण्यात आले.

भारताचे उपराष्ट्रपती महामाहीम जगदीप धनखड यांनी केलेले संविधान मंदिराचे उदघाटन व मार्गदर्शन ऑनलाईन पाहण्यात आले. दरम्यान महाराष्ट्रातील ४३४ आयटीआय कॉलेजमध्ये एकाचवेळी आभासी पद्धतीने संविधान मंदिराचे उद्घाटन करण्यात आले.

या वेळी कॉलेजचे गटनिदेशक एस.एस. कदम, पी. एस. कांबळे, वरवठणे सरपंच ऋतुजा म्हात्रे, आंबेडकर चळवळीचे युवा नेते संतोष गायकवाड, भगवान बिनेदार, प्रभाकर ओव्हाळ, प्राथमिक आरोग्य केंद्र नागोठणेचे आरोग्य सेवक वंदन तांबोळी, सामाजिक कार्यकर्ते दिनेश घाग, गणपत म्हात्रे आदींसह शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

## लाडकी बहीण योजना समिती सदस्यपदी अ‍ॅड. राजेंद्र निगुडकर

**कर्जत : प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेसचे रायगड जिल्हा चिटणीस अ‍ॅड. राजेंद्र निगुडकर यांची लाडकी बहीण योजना कर्जत-खालापूर विधानसभा मतदारसंघ समितीच्या अशासकीय सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे.



आमदार महेंद्र थोरवे यांच्या अध्यक्षतेखाली ही समिती काम करणार असून या समितीमध्ये दोन अशासकीय सदस्यांची नियुक्ती करण्यात आली. त्यापैकी एक अ‍ॅड. निगुडकर आहेत. त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## मुख्यमंत्री योजनादूत अर्ज करण्यास मुदतवाढ

**रायगड जिल्ह्यात १,२४० पदवीधर उमेदवारांना संधी**

**रायगड : रामप्रहर वृत्त**

शासनाच्या मुख्यमंत्री योजनादूत उपक्रमात सहभागी होण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली असून आता १७ सप्टेंबरपर्यंत नोंदणी अर्ज करता येणार आहे. रायगड जिल्ह्यात १२४० योजनादूतांची नेमणूक करण्यात येणार आहे. इच्छुक उमेदवारांनी www.mahayojanadoot.org या संकेतस्थळावर तत्काळ अर्ज करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत मुख्यमंत्री योजनादूत उपक्रम राबविण्यात येत आहे. प्रत्येक ग्रामपंचायत पातळीवर एक तर शहरी भागात प्रत्येक पाच हजार लोकसंख्येमागे एक अशा पद्धतीने राज्यात एकूण ५० हजार योजनादूतांची सहा महिन्यांसाठी निवड केली जाणार आहे.

या योजनादूतांना दरमहा १० हजार रूपये मानधन दिले जाणार आहे. हे योजनादूत शासनाच्या लोककल्याणकारी योजनांबाबत नागरिकांना माहिती देतील. या उपक्रमासाठी आतापर्यंत एक लाख ६६ हजारांहून अधिक उमेदवारांनी नोंदणी केली आहे.

या योजनेत सहभागी होण्यासाठी इच्छुक उमेदवार १८ ते ३५ वयोगटातील असावा, उमेदवार कोणत्याही शाखेचा पदवीधर असणे आवश्यक आहे, उमेदवाराकडे महाराष्ट्राचे अधिवास प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. उमेदवारास संगणक ज्ञान असावे. त्याच्याकडे अद्ययावत मोबाईल (स्मार्ट फोन) आणि आधारसंलग्न बँक खाते असणे आवश्यक आहे. इच्छुक उमेदवारांना १७ सप्टेंबरपर्यंत www.mahayojanadoot.org या संकेतस्थळावर नोंदणी करता येईल. योजनादूत पोर्टलवर ज्या उमेदवारांनी नोंदणी केली आहे अशा उमेदवारांनी apply बटन दाबून अर्ज Submit करायला विसरू नये, तरच नोंदणीची प्रक्रिया पूर्ण होणार आहे. जास्तीत जास्त उमेदवारांनी नोंदणी करावी असे आवाहन करण्यात आले आहे.

## खालापूर शिक्षण प्रसारक मंडळाच्या विधी महाविद्यालयास परवानगी



**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर शिक्षण प्रसारक मंडळाला शासनाने विधी महाविद्यालयाची परवानगी मिळाली आहे. त्या संदर्भातील माहिती संस्थेचे अध्यक्ष संतोष संगम यांनी दिली.

खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या प्रयत्नाने खोपोलीत मुंबई विद्यापीठ संलग्नित विधी महाविद्यालय शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५पासून सुरू करण्यात आले आहे. ज्या विद्यार्थ्यांनी विधी महाविद्यालय प्रवेशाची सीईटीची परिक्षा दिली असेल, त्यांनी त्वरीत सीईटी सेल महाराष्ट्र या वेबसाईटवर ऑनलाईन प्रवेश अर्ज भरावा, असे आवाहन जंगम यांनी केले.

शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील व मावळचे खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांच्या विशेष सहकार्यामुळे विधी महाविद्यालयाची परवानगी मिळाली. त्यामुळे संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांचे आभार मानले आहेत. संस्थेचे अध्यक्ष संतोष जंगम, कार्यवाहक किशोर पाटील, संस्थेचे फायनान्स संचालक यशवंत साबळे तसेच संस्थेचे सर्व पदाधिकाऱ्यांच्या पाठपुराव्याने यश मिळाल्यामुळे संस्थेचे कौतुक होत आहे.

ऑनलाईन प्रवेश फेरीसाठी अर्ज दाखल करण्याची तारीख १९ सप्टेंबरपर्यंत आहे. गुणवत्ता यादी २० सप्टेंबर रोजी जाहीर करण्यात येईल. निवड झालेल्या विद्यार्थ्यांनी आपले प्रवेश २० ते २४ सप्टेंबरपर्यंत निश्चित करावयाचे आहेत. प्रवेश प्रक्रियेची अंतिम दिनांक २५ सप्टेंबर आहे. अधिक माहितीसाठी (९७०२०२३४९१), (९३३६२३९४३६) या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## मुरूड शहरात पोलिसांचा रूट मार्च

**मुरूड : प्रतिनिधी**

नुकतीच गौरी गणपती विसर्जन मिरवणुकीवर झालेल्या दगडफेकीच्या घटनेनंतर कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी शहरातील रॅपिड अ‍ॅक्शन फोर्स पोलिसांचा रुट मार्च काढण्यात आला.

या वेळी अलिबाग विभागीय पोलीस अधिकारी विनित चौधरी, मुरूड पोलीस निरीक्षक उदय झावरे, उपनिरीक्षक अविनाश ढाकरे, मकरंद पाटील, विक्रांत बांधणकर, प्रशांत लोहार क्यूआरटी पथक, एसपीआरएफ प्लाटून, स्ट्रायकिंग फोर्स आदींसह कर्मचारी सहभागी झाले होते.

शहरातील भोगेश्वर पाखाडी, बाजारपेठ, दत्तवाडी, गणेश आळी, पेठ मोहल्ला, लक्ष्मीखार आदी संवेदनशील भागात रुट मार्च काढण्यात आला. सशस्त्र पोलीस जवानांनी शहर पिंजून काढल्याने लोकांना पोलिसांचा धाक निर्माण होण्यास मदत झाली आहे.



## नृत्य स्पर्धेत पेणजाई नृत्यकला पथक विजेते



**माणगाव :** मंडणगड तालुका कुणबी सेवा संघातर्फे आयोजित करण्यात आलेल्या गौरी गणेश जाखडी नृत्य स्पर्धेत पेणजाई नृत्य कलापथक पेण तर्फ तळे यांनी प्रथम क्रमांक पटकावला आहे.

संभूराजू तुरेवाले सांस्कृतिक उन्नती मंडळ व ओम शिवशंभो उन्नती कला मंडळ रायगड रत्नागिरी यांच्या विद्यमाने स्पर्धा कुणबी भवनचा राजा गणेशोत्सवात सोमवारी (दि.९) आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत पाच नृत्य कलापथकांनी सहभाग घेतला होता.

दुर्मिळ होत जाणारी जाखडी नृत्यकला जतन व संवर्धन करण्याचे काम पेणजाई नृत्यकला पथक करीत आहे. पारंपरिकता, अध्यात्मिकता व आधुनिक पद्धतीचा साज यांचा सुंदर मिलाफ घालून नृत्यकला सादर केली जाते. शाहीर भागोजी पोटले शाहीर सदानंद अधिकारी, नृत्यकार घनश्याम मोंडे व सहकलाकार, ढोलकी वादक तुकाराम पोटले, सहदेव पोटले यांनी सुंदर सादरीकरण करून प्रथम क्रमांक पटकावल्याबद्दल त्यांचे अभिनंदन होत आहे.

शाहीर शिवराम पोटले, शाहीर पोपट पोटले, शाहीर गजानन पोटले, सामाजिक कार्यकर्ते विद्यानंद अधिकारी नामदेव ताम्हणकर, दगडू पाखड, कलगीतुरा मंडळाचे अध्यक्ष रामभाऊ टेंभे इत्यादींचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

## श्री तीर्थक्षेत्र महादेव तळाघर यात्रेची गणेशोत्सवात प्रतिकृती




**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील तळाघर गावातील मोंडे परिवाराच्या घरी दहा दिवसांच्या बाप्पा विराजमान झाला आहे. यावर्षी त्यांनी तळाघरच्या महादेवाची लग्न यात्रेचा देखावा केला आहे.

देखावातून अतिशय विस्तृत अशी माहिती दाखवलेले आहे. यामध्ये श्री क्षेत्र स्वयंभू महादेव मंदिर तळाघरची (महादेवाडी) यात्रा चैत्र महिन्यात दोन दिवस भरते. शिव/पार्वतीचा लग्न सोहळा महाराष्ट्रात फक्त या यात्रेत पहावयास मिळतो. पेशवे-सिद्दी यांच्यामध्ये १७३३मध्ये झालेल्या करारामध्ये या यात्रेची नोंद आहे. ग्रामीण भागातील संस्कृती जपण्यासाठी ही यात्रा चालू केल्याचा उल्लेख सापडतो. देवस्थानाला यात्रेच्या व नैमित्तिक खर्चासाठी पेशवेकाळात जमिनी ईनाम म्हणून दिल्या गेल्या आहेत. त्यांच्या नोंदी शासन दरबारी देवस्थानाच्या ७/१२ वर अस्तित्वात आहेत. वारळपासून मुरूडजवळील मिठागर, खामदे, रहाटाड, मांदाड, उसडी, जमृतखार या अनेक कोळी गावातुन ७० मानाच्या काठ्या तसेच रोहा तालुक्यातुन अनेक काठ्या या यात्रेसाठी येतात.

तळाघर यात्रेत पंचक्रोशीला पंरपरागत मान आहेत. महादेवाडी येथील विश्वकर्मा सुतार देवस्थानाचे पुजारी भगत आहेत. तळाघरच्या पाटील घराण्याकडे दिपमाळ लावण्याचा व निवी येथील बामुगडे घराण्याकडे भगतावर छत्री धरण्याचा मान आहे.

सोनगावचे ग्रामस्थ तेळवण ते वरातीपर्यंतचे आमंत्रण देतात. देवाच्या वरातीसाठी पालखीचा मान खारगाव गावाला आहे. बोहल्याचा मान धाटावचे रटाटे घराण्याकडे तर सुतार भगत महादेवाची मूर्ती घेऊन विवाह सोहळ्यासाठी बसतात. तळाघरची काठी करवला व किल्ला गावची काठी करवली असते, तर देवाचा लग्न लावण्याचा मान जंगम समाजाला असतो. वरसगावचा ढोल व सुकेळीची दिवटी लग्न मुहूर्ताला असणे बंधनकारक असते.या लग्नाचा मुहूर्त काढण्याची अनोखी पद्धत आहे. ज्या दिवशी गुढीपाडवा त्याच वारी पुढील आठवड्यात रात्री १२ वा.लग्न लागते.

## सुगरण पक्ष्यांची घरकुल बांधण्यास सुरुवात

**चौक : प्रतिनिधी**

सुगरण पक्षाने भर पावसात त्याने घरटे बांधण्यास सुरुवात केली आहे. पिवळ्या धम्मक रंगातील हा पक्षी त्याच्या घरटी बांधण्याच्या कलेसाठी प्रसिद्ध आहे.

खालापूर तालुक्यातील वावंढळ गाव तलावाशेजारी एका झाडावर त्याने पाच ते सहा घरटी बांधण्यास सुरुवात केली आहे. हिरव्यागार गवताच्या काडीने विणकाम सुरू आहे. लांब अकराच्या पुंगीसारखी घरे बनवताना दिसत असून विणकाम करताना त्याचा मंजुळ आवाजाने भुरळ घालत आहे. मे ते सप्टेंबर या महिन्यादरम्यान विणीचा हंगाम असतो, असे म्हणतात. सुगरण पक्ष्यांमध्ये नर हा मुख्यत्वे घरटी बांधण्याचे काम करतो.

एकावेळी ४ ते १० अर्धवट घरटी बांधून झाल्यावर नर सुगरण घरट्यांच्या जवळ एखाद्या ठिकाणी बसून मादीला आकृष्ट करण्यासाठी छान गाणी म्हणतो. मादी आल्यावर प्रत्येक घरटे तपासून पाहते. घरटे पसंत पडल्यावरच ती नराशी मादीचे मिलन होते. त्यानंतर मादी उर्वरित घरटे पूर्ण करते. असे घरटे एखाद्या झाडाला किंवा विहिरीत किंवा अन्यत्र टांगलेले असते. सुगरण पक्ष्याच्या घरट्यात खालच्या बाजूने प्रवेशद्वार ठेवले जाते. वरच्या भागात दोन किंवा जास्त कप्पे दिसत आहेत. अतिशय सुंदर, मजबूत व व्यवस्थित विणलेले आहे.



घरट्याच्या फुगीर भागात ओल्या मातीचा गिलावा सारखा प्रयत्न होताना दिसतो. मादी एकावेळी दोन ते चार अंडी देते. ही अंडी शुभ्र पांढऱ्या रंगाची असतात. अंडी उबविणे, पिलांना खाऊ घालणे वगैरे कामे मादी एकटीच करते. अतिशय मेहनत आहे आणि मंजुळ आवाज घुमत असतो.

